cmyk

## संपादकीय

### बकाल शहरे विकसीत व्हावीत एवढीच अपेक्षा आणि शुभेच्छा

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पुणे महापालिका यशदा आणि इतर संस्थांच्या वतीने आयोजित पुणे अर्बन डायलॉग: आव्हाने आणि उपाय या परिषदेचे उद्घाटन करताना विकास आराखडा आणि अर्थसंकल्प यांचा एकमेकांशी संबंध आवश्यक आहे. अर्थव्यवस्थेच्या विकासाबरोबरच जे शहरीकरण वाढत आहे त्याकडे लक्ष देण्याची गरज आहे अशी भूमिका मांडली. या भूमिकेचे सहर्ष स्वागत करताना विक्रमाच्या भूमिकेतील फडणवीस आणि वेताळाच्या भूमिकेतील मित्र पक्ष व सरकारी यंत्रणा डोळ्यासमोर येते.


# दैनिक राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

बीड – महाराष्ट्र | वर्ष –५ | अंक–११ | बुधवार, दि.३० एप्रिल २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये


### दहशतवादी हल्ल्यातील मृतांच्या कुटुंबीयांना ५० लाखांची मदत

मुंबई : जम्मू-काश्मीर येथील पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्यात २६ निरपराध नागरिकांना आपला जीव गमवावा लागला. या हल्ल्यात मृत्युमुखी पडलेल्या पर्यटकांमध्ये सहा जण महाराष्ट्रातील होते. कुटुंबातील कर्त्याधर्त्या व्यक्तींच्या मृत्यूने या कुटुंबांवर दु:खाचा डोंगर कोसळला. या पार्श्वभूमीवर सदर कुटुंबांना आर्थिक मदत करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला असून पीडित कुटुंबांना प्रत्येकी ५० लाख रुपयांची मदत करण्यात येणार आहे. याबाबतचा निर्णय आज झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला आहे. पहलगाम येथे क्रूर दहशतवाद्यांनी धर्म विचारून निष्पाप नागरिकांवर गोळीबार करत त्यांचा जीव घेतला.

# शेतीतील पायाभूत सुविधा निर्मितीसाठी २५ हजार कोटी

## एका वर्षाला ५ हजार कोटी या प्रमाणे खर्चाला मान्यता, मंत्रिमंडळ बैठकीत निर्णय

**मुंबई । प्रतिनिधी**

**राज्य सरकारने कृषी क्षेत्रात भांडवली गुंतवणूक करण्यासाठी नवीन योजना राबवण्याचा निर्णय मंत्रिमंडळ बैठकीत घेतला आहे. त्यासाठी पुढील ५ वर्षात दरवर्षी ५ हजार कोटी रुपयांची अशी एकूण २५ हजार कोटींची तरतुद करण्यास राज्य मंत्रिमंडळाने मान्यता दिली आहे. यामध्ये राज्य सरकार शेतीतील पायाभूत सुविधा निर्मितीवर लक्ष देणार असल्याचे कृषी विभागाचे प्रधान सचिव विकास चंद्र रस्तोगी यांनी स्पष्ट केले आहे.**



मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली मंगळवारी (दि.२९) मंत्रिमंडळाची बैठक झाली. या बैठकीत शेती क्षेत्रातील भांडवली गुंतवणूक वाढवण्यासाठी नवीन योजना सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. तसेच या योजनेतून अत्यल्प, अल्प भूधारक, दिव्यांग आणि महिला शेतकरी ह्यांना प्रथम प्राधान्य देण्यात येणार आहे. त्यासाठी लाभार्थीचा जिल्हानिहाय लक्षांक निश्चित करण्यात येणार असून फर्स्ट कम फर्स्ट सर्व्ह या तत्त्वावर राबवण्यात येणार आहे, असल्याचं रस्तोगी यांनी प्रसिद्ध पत्रकात सांगितले आहे. शेतकऱ्यांना हवामानातील बदलांना तोंड देता यावे, यासाठी गुंतवणूक करण्यात येणार आहे. तसेच कृषी यांत्रिकीकरण, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, पाण्याचा सुयोग्य व किफायतशीर वापर करण्यासाठी शेततळे, सूक्ष्म सिंचन, ठिबक/ तुषार सिंचन यासारख्या बाबींवर भर देण्यात येणार आहे. तर नियंत्रित शेतीसाठी शेडनेट, हरितगृह, पॉलीहाऊस, संरक्षित शेती, प्लास्टिक अस्तरीकरण, मल्चींग पेपर, क्रॉप कव्हर, काटेकोर शेती, पॅक हाऊस, गोडाऊन, कोल्ड स्टोरेज, काढणी पश्चात व्यवस्थापन, कृषि प्रक्रिया, मूल्य साखळी विकसन, शेतमालाच्या ब्रँडिंग, पॅकेजिंग, साठवणूक सुविधेसाठी गोडाऊन, कोल्ड स्टोरेज, पॅक हाऊस आदि सुविधासाठी गुंतवणूक करण्यात येणार असल्याचं कृषी विभागाने स्पष्ट केले आहे. तसेच शेतकऱ्यांसाठी शेळी पालन, फळबाग लागवड, रेशीम उद्योग इत्यादी बाबींसाठी सहाय्य/अनुदान उपलब्ध करून देण्यात येणार आहे. यासाठी राज्य सरकारने एकूण पुढील ५ वर्षात २५ कोटी रुपयांची तरतुद करण्यास मान्यता दिली आहे. या निधीच्या एकूण मंजूर निधीपैकी १ टक्के वापर हा शेतकरी आणि इतर घटकांच्या प्रशिक्षण व प्रत्याक्षिकांसाठी

◀◀ पान २ वर

# काँग्रेस आक्रमक, संसद अधिवेशनाची मागणी !

## काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे आणि विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांचे पंतप्रधान मोदींना पत्र



**नवी दिल्ली । वृत्तसंस्था**

**जम्मू-काश्मीरमधील पहलगाम येथे झालेल्या दहशतवादी हल्ल्याच्या पार्श्वभूमीवर संसदेचं विशेष अधिवेशन तातडीने बोलवावे, अशी मागणी काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे आणि विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडे केली आहे. या मागणीसाठी त्यांनी पंतप्रधानांना अधिकृत पत्रही पाठवले आहे.**

राहुल गांधींनी पत्रात म्हटले आहे की, ''देशात दहशतवादाचा सामना करण्यासाठी आणि या संकटाच्या काळात एकजूट दाखवण्यासाठी संसद हे महत्त्वाचे व्यासपीठ ठरू शकते. संसदेमध्ये सरकारने आपली सुरक्षा नीती, उपाययोजना यावर चर्चा करावी आणि संपूर्ण देश एकत्र उभा आहे, हे दाखवावे.'' काँग्रेस अध्यक्ष खर्गे यांनीही असाच सूर आळवला आहे. ते आपल्या पत्रात म्हणतात, ''या क्षणी देशाला सर्वाधिक एकतेची गरज आहे. संसदेचे विशेष अधिवेशन बोलवून आपला सामूहिक निर्धार, इच्छाशक्ती आणि देशासाठीची बांधिलकी जगापुढे ठळकपणे दिसेल. २२ एप्रिल रोजी पहलगाममध्ये झालेल्या क्रूर दहशतवादी हल्ल्यानंतर अशी पावले उचलणं गरजेचे आहे.'' दोन्ही नेत्यांनी पंतप्रधान मोदी यांना विनंती केली आहे की, देशाच्या सुरक्षेचा प्रश्न असताना राजकारणापलीकडे जाऊन सर्व पक्ष एकत्र यावेत आणि संसदेच्या माध्यमातून राष्ट्राच्या सुरक्षिततेसाठी ठोस निर्णय घ्यावेत.

# पंतप्रधान मोदी यांच्या अध्यक्षतेखाली उच्च स्तरीय बैठक

## राजनाथ सिंग, राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार अजित डोवाल, संरक्षण प्रमुख अनिल चौहान उपस्थिती

**नवी दिल्ली । वृत्तसंस्था**

**जम्मू आणि काश्मीरच्या पहलगाम येथे गेल्या आठवड्यात झालेल्या भीषण दहशतवादी हल्ल्यात २६ जण बहुतेक नागरिक मृत्युमुखी पडल्याच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मंगळवारी केंद्रीय संरक्षण मंत्री राजनाथ सिंह, राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार (एनएसए) अजित डोवाल आणि संरक्षण प्रमुख अनिल चौहान यांच्यासोबत आणखी एक उच्चस्तरीय बैठक घेतली.**



नवी दिल्ली येथील पंतप्रधानांच्या अधिकृत निवासस्थानी झालेल्या या बैठकीत भारतीय सशस्त्र दलांच्या तिन्ही दलांचे प्रमुख लष्करप्रमुख जनरल उपेंद्र द्विवेदी, नौदलप्रमुख ॲडमिरल दिनेश के त्रिपाठी आणि हवाई दल प्रमुख अमर प्रीत सिंग उपस्थित होते. पंतप्रधानांच्या अध्यक्षतेखालील कॅबिनेट कमिटी ऑन सिक्युरिटीची बैठक होण्याच्या एक दिवस आधी ही बैठक झाली. राष्ट्रीय सुरक्षेच्या बाबींवरील

◀◀ पान २ वर

# सुशिल सोळंके यांचा अटकपूर्व जामिन उच्च न्यायालयाने फेटाळला

**माजलगाव । प्रतिनिधी**

**माजलगाव मतदार संघाचे आमदार प्रकाश सोळुंके यांचे खंदे समर्थक माजलगाव पंचायत समितीचे माजी उपसभापती सुशील सोळुंके यांच्यासह त्यांच्या समर्थकावर अशोक सोळुंके यांच्या दुकानात जाऊन हल्ला केल्याप्रकरणी गुन्हा दाखल झाला होता. या गुन्ह्यात अटकपूर्व जामीन मिळवण्यासाठी त्यांनी औरंगाबाद हायकोर्ट मध्ये धाव घेतली होती मागिल दोन महिन्यांपुर्वी २ महिन्याचा अंतरीम जामीन त्यांना दिला होता. मात्र आता मा. उच्च न्यायालयाने सुशील सोळंके यांचा जामीन अटकपूर्व जामीन फेटाळला आहे. त्यामुळे त्यांच्यावर आता अटकेची**



टांगती तलवार आहे.

फिर्यादिचे वकील ॲड. सुदर्शन सोळंके यांनी जोरदार युक्तिवाद केला आणि त्यानंतर उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबादचे मा. न्यायमुर्ती अरुण पेडणेकर यांनी हा जामिन फेटाळला. पोलीस ठाणे माजलगाव शहर येथे अशोक बाळासाहेब सोळंके याने सुशिल साळुंके व इतर ६ आरोपीविरुध्द तक्रार दाखल केली होती. फिर्यादीत म्हटले होते की, आरोपी सुशिल साळुंके याची आई ग्रामपंचायत सरपंच आहे. फिर्यादी व

◀◀ पान २ वर

# कॅबिनेटमंत्री राधाकृष्ण विखे पाटलांसह माजी मंत्र्यावर गुन्हा दाखल

## शेतकऱ्यांच्या नावे कर्ज घेऊन ते न वाटल्याने सर्वोच्च न्यायालयाचा आदेश

**अहिल्यानगर । प्रतिनिधी**

**राज्याचे जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या अडचणी वाढल्या असून सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानंतर त्यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, माजी मंत्री आण्णासाहेब म्हस्के यांच्यासह ५४ जणांवर फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आल्याने जिल्ह्याच्या राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे.**



साखर कारखाना कर्जमाफी प्रकरणात ९ कोटींच्या अपहार प्रकरणी लोणी पोलिस ठाण्यात हा गुन्हा दाखल झाला आहे. शेतकऱ्यांच्या नावे राष्ट्रीयकृत बँकांकडून कर्ज घेऊन शेतकऱ्यांना वितरित न केल्याचा आरोप मंत्री महोदयांवर ठेवण्यात आला आहे. सन २००४ -२००५ आणि २००७ साली अपहार केल्याचे दाखल फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. कारखान्याच्या तत्कालीन संचालक मंडळावर गुन्हा दाखल करावा, या मागणीसाठी

◀◀ पान २ वर

# रियल इस्टेट डेव्हलपर्स आणि बँकामधील लागेबांधेंची चौकशी करा; सीबीआयला सर्वोच्च न्यायालयाचे निर्देश

**नवी दिल्ली । वृत्तसंस्था**

सर्वोच्च न्यायालयाने मंगळवारी केंद्रीय अन्वेषण ब्युरो (सीबीआय) ला दिल्ली आणि एनसीआर क्षेत्रातील रिअल इस्टेट डेव्हलपर्स आणि बँकांमधील कथित 'अपवित्र' युतीबाबत सात प्राथमिक प्रकरणात चौकशी करण्याचे निर्देश दिले. सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती सूर्यकांत आणि एन. कोटिश्वर सिंह यांच्या खंडपीठाने एनसीआर प्रदेशात, विशेषतः नोएडा, ग्रेटर नोएडा आणि गुरुग्राममध्ये सबव्हेन्शन योजनांअंतर्गत फ्लॅट बुक केलेल्या गृहखरेदीदारांच्या याचिकांवर सुनावणी करत असताना हा आदेश दिला. या याचिकांमध्ये बँका त्यांच्या घरांचा ताबा मिळालेला नसतानाही त्यांना ईएमआय भरण्यास भाग पाडत असल्याचा आरोप करण्यात आला होता. सर्वोच्च न्यायालयाने आदेश दिलेली पहिली सीबीआय चौकशी सुपरटेक लिमिटेडवर केंद्रित असेल, जी एक प्रमुख विकासक आहे जी विविध उल्लंघनांसाठी आधीच चौकशीत आहे. दुसरी चौकशी दिल्लीच्या पलीकडे जाऊन नोएडा, ग्रेटर नोएडा,

◀◀ पान २ वर

# कॉमनवेल्थ गेम्स घोटाळ्यात सुरेश कलमाडींना क्लीन चीट!

## ईडीकडे पुरावेच नाहीत; १३ वर्षांनंतर निकाल



**नवी दिल्ली । वृत्तसंस्था**

सन २०१० साली नवी दिल्लीत पार पडलेल्या राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धांच्या (२०१०) आयोजनात झालेल्या कथित भ्रष्टाचारप्रकरणी तब्बल १३ वर्षांपासून सुरू असलेल्या खटल्याला अखेर पूर्णविराम मिळाला आहे. दिल्लीतील एका विशेष न्यायालयाने सक्तवसुली संचलनालयाने दाखल केलेला क्लोजर रिपोर्ट स्वीकारला असून, या निर्णयामुळे मनी लाँडरिंगच्या सर्व आरोपांना न्यायालयीन सुट दिली गेली आहे. या कथित घोटाळ्यावरून तत्कालीन काँग्रेस सरकारवर तसेच तत्कालीन क्रीडा मंत्री सुरेश कलमाडी यांच्यावर हे आरोप झाले होते. पण आता त्यांना या आरोपांतून क्लीन चीट मिळाली आहे.

सन २०१० मध्ये दिल्लीमध्ये झालेल्या राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धांमध्ये आर्थिक भ्रष्टाचार झाल्याचा आरोप तत्कालीन क्रीडा मंत्री सुरेश कलमाडी आणि

◀◀ पान २ वर

## बाजारभाव

**कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.२८ एप्रिल २०२५**

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| शेतमाल (आवक) | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ९०.५० क्विंटल | २,४४० | २,७०१ | २,५५५ |
| ज्वारी/हायब्रिड : ६५.०० क्विंटल | १,६५० | २,६११ | २,२५४ |
| मका/लोकल:३०.०० क्विंटल | २,१२५ | २,१२५ | २,१२५ |
| तूर : १.०० क्विंटल | ६,४०१ | ६,६०० | ६,५०० |
| उडीद : १.०० क्विंटल | ५,४०० | ५,४०० | ५,४०० |
| बाजरी: ९२.०० क्विंटल | २,३४४ | २,७२४ | २,५२४ |
| मुग :४.५० क्विंटल | ७,२०१ | ७,५०० | ७,३५० |
| सोयाबीन: १०२.५० क्विंटल | ४,४०१ | ४,४४१ | ४,४२२ |
| हरभरा: ४९.०० क्विंटल | ५,३०१ | ६,००० | ५,४९९ |


# खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर कृषिमंत्र्यांनी घेतली आढावा बैठक

## खत पुरवठ्यासाठी अधिकाऱ्यांना दिल्या सूचना

**नवी दिल्ली । वृत्तसंस्था**

**आगामी खरीप हंगाम २०२५ साठी खतांच्या गरजेसाठी राज्यांशी समन्वय ठेवला जात असल्याचं केंद्रीय कृषिमंत्री शिवराजसिंह चौहान यांनी सांगितलं आहे. कृषिमंत्र्यांनी नवी दिल्ली येथील कृषी भवनात साप्ताहिक आढावा बैठक घेतली. या बैठकीला कृषी सचिव देवेश चतुर्वेदी आणि कृषी विभागाचे अधिकारी उपस्थित होते.**

भारतीय राष्ट्रीय कृषी सहकारी पणन संघ मर्यादित म्हणजेच नाफेड आणि राष्ट्रीय बागायती मंडळ अर्थात एनएचबीच्या



कामकाजाचा आढावा कृषिमंत्र्यांनी घेतला. तसेच शेतकरी हितासाठी आवश्यक सूचना केल्याचं कृषी विभागाने सांगितलं आहे. देशात खतांची मागणी दिवसेंदिवस वाढू लागली आहे. मागील रब्बी हंगामाच्या सुरुवातीला खत टंचाईनं खतांचा काळाबाजार फोफवला होता. त्यामुळे शेतकऱ्यांना वेळेवर खत मिळालं नाही. तसेच खतांच्या गोणीसाठी जादाचे पैसेही मोजावे लागले. २०२५ चा खरीप हंगाम तोंडावर आला आहे. त्यामुळे शेतकरी निविष्ठा खरेदीचं नियोजन करत आहेत. त्यामुळे ऐन हंगामात खत आणि बियाणे टंचाई निर्माण होऊ नये, यासाठी केंद्रीय कृषिमंत्र्यांनी अधिकाऱ्यांना सूचना दिल्या आहेत. तसेच

### गहू पिकाची स्थिती

देशात रब्बी हंगामात गहू प्रमुख पीक आहे. गव्हाच्या उत्पादनाता उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश, पंजाब, हरियाणा, राजस्थान व बिहार या राज्यांचा वाटा सर्वाधिक आहे. २५ एप्रिल २०२५ पर्यंतच्या गहू काढणीच्या आकडेवारीनुसार मध्यप्रदेश, गुजरात, राजस्थान या राज्यांमध्ये १०० टक्के गहू काढणी झाली आहे. तर हरियाणा ९२ टक्के, उत्तर प्रदेश ८८ टक्के, बिहार ८८ टक्के आणि पंजाब ८० टक्के गव्हाची काढणी पूर्ण झाली आहे.

### तांदूळ आणि गव्हाचा संरक्षित साठा

देशातील गहू आणि तांदळाचा संरक्षित साठा (बफर साठा) वाढल्याचं नाफेडच्या व्यवस्थापकीय संचालकांनी सांगितलं. गव्हाचा साठा ११७.९४ लाख टन आहे. तर तांदळाचा साठा ३८२.०९ लाख टन आहे. दोन्हींचा साठा बफर साठ्याच्या मानक तुलनेत २१०.४० लाख टन अधिक असल्याचा दावाही नाफेडच्या व्यवस्थापकीय संचालकांनी केला आहे. यावर कृषिमंत्री चौहान यांनी ग्राहकांना स्वस्तात धान्य मिळावं आणि शेतकऱ्यांना योग्य मोबदला मिळावा, यासाठी प्रयत्न करण्याचे निर्देश दिले.

कृषी निविष्ठांच्या दराचा आढावाही कृषिमंत्र्यांनी या बैठकीत घेतला आहे. पिकांची कापणी, पेरणी, खरेदी, खतं, बियाण्यांची

◀◀ पान २ वर

cmyk

## अग्रलेख

# बकाल शहरे विकसीत व्हावीत एवढीच अपेक्षा आणि शुभेच्छा

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पुणे महापालिका यशदा आणि इतर संस्थांच्या वतीने आयोजित पुणे अर्बन डायलॉग: आव्हाने आणि उपाय या परिषदेचे उद्घाटन करताना विकास आराखडा आणि अर्थसंकल्प यांचा एकमेकांशी संबंध आवश्यक आहे. अर्थव्यवस्थेच्या विकासाबरोबरच जे शहरीकरण वाढत आहे त्याकडे लक्ष देण्याची गरज आहे अशी भूमिका मांडली. या भूमिकेचे सहर्ष स्वागत करताना विक्रमाच्या भूमिकेतील फडणवीस आणि वेताळाच्या भूमिकेतील मित्र पक्ष व सरकारी यंत्रणा डोळ्यासमोर येते. वाढत्या शहरीकरणावर बोलताना मुख्यमंत्र्यांनी राज्यातील ५० टक्के लोकसंख्या अवघ्या ५०० शहरांमध्ये आणि उर्वरित लोकसंख्या ४० हजार गावांमध्ये राहते हे वास्तव मांडले. पाचशे शहरांचा चेहरामोहरा बदलला तर ५० टक्के लोकसंख्येला उत्तम जीवनमान देऊ शकतो असे मत त्यांनी यावेळी व्यक्त केले. शहरीकरणाकडे लक्ष देण्याऐवजी त्याला पाप समजत राहिलो ही एक प्रकारची चूक असल्याचे त्यांनी अप्रत्यक्षरीत्या सांगून टाकले.

आतापर्यंत सर्व राज्यकर्त्यांनी मुंबईनंतर नवी मुंबई आणि पाठोपाठ पुणे, नाशिक, नागपूर, औरंगाबाद, कोल्हापूर या शहरांचा ज्या पद्धतीने विकास केला ते लक्षात घेतले तर त्या त्या काळातील राज्यकर्त्यांनी या विकासाला पाप समजले असे म्हणता येणार नाही. पण जे अडथळे आज फडणवीस यांच्या पुढे आहेत कदाचित तीच स्थिती त्यांचीही आणि त्यांच्या नोकरशाहीचीही असेल. मुख्यमंत्र्यांनी ज्याला पाप म्हटले त्यातील मूळ पाप हे ग्रामीण भागातील सर्वसामान्य जनतेचे शहराकडे झालेले स्थलांतर हे आहे, हे लक्षात घेतले पाहिजे. या स्थलांतरामध्ये पाच मोठ्या शहरात वाढलेली लोकसंख्या, मुंबई, नवी मुंबई, ठाणे आणि त्या परिसरात वाढलेली शहरे, त्याच्या पाठोपाठ लोंढा वाढत पुण्यात येऊन पुण्याचा मुंबईपेक्षा अधिक झालेला विस्तार याचा जर विचार केला तर हे पाप सगळ्यांच्याच काळात वाढले हे मान्य करावे लागेल. या विकसित विभागात राज्यभरातून व परप्रांतातून प्रचंड प्रमाणात लोंढे येत राहिले. नगर नियोजन या विषयाचा सर्वच सत्ताधीशांच्या काळात बोजवारा उडाला. अर्थात मुख्यमंत्री यांना त्याहूनही अधिक गंभीर माहित असल्याने त्यांना यातून वाट काढायची आहे. त्यासाठी अर्थसंकल्पातील निधी हा राज्याने ठरवलेल्या नागरिकांच्या वाढत्या प्रश्नाच्या अनुषंगाने केलेल्या आराखड्यानुसार खर्च झाला पाहिजे असा त्यांचा आग्रह आहे. हा आग्रह त्यांना सार्वजनिक ठिकाणी व्यक्त करावा लागला यालाही काही कारण आहे. ते समजून घ्यावे लागेल.

समाजातील सर्व क्षेत्रात काम करणारे धुरीण, शासकीय नोकरीत असणारे आणि असे काही करायची इच्छा असूनही मुख्यमंत्र्यांपर्यंत आपला या विषयातील आराखडा पोहोचवू न शकणारे आणि तसा कोठे राबवण्याचा प्रयत्न करत असताना विविध यंत्रणांकडून दबाव आणून गप्प बसवले गेलेले अधिकारी, वेगळा विचार करणारे लोकप्रतिनिधी या सर्वांनी या विषयावर बोलते व्हावे, आपण त्यांना बळ देऊ हे सांगण्याचा त्यांचा उद्देश दिसतो. अर्बन डायलॉग सारखे उपक्रम अशा बाबतीत सरकारने धोरण करावे आणि त्या धोरणानुसार वागण्याची सर्वसामान्यांपर्यंत माहिती पोहोचावी यासाठी उपयुक्त असतात. त्यातून जाणत्या वर्गाचे एकमत घडते. प्रशासकीय अधिकाऱ्यांनी अशा वक्तव्यांचा आणि त्यात मांडले गेलेल्या विचारांचा अभ्यास करून आपापल्या कार्यक्षेत्रापूरती जरी सुधारणा करायची ठरवली तरी फार मोठा बदल घडू शकतो किंवा ते एक समाज विकासाचे मॉडेल बनवून लोकांच्या समोर राहू शकते. टी चंद्रशेखर वगैरे अनेक अधिकाऱ्यांचे त्यासाठीच प्रशासनात नाव आहे. आपल्या भागाचा विकास आणि नागरिकांच्या समस्यांवर उपाय काढताना त्यांना अनेक कटकटींना सामोरे जावे लागते आणि विकास आराखड्यानुसार खर्च करताना त्यांना मर्यादा येतात. शासन निधी आणि मंत्रालयातून थेट कामे मंजूर करून आणण्याच्या पद्धतीमुळे प्रत्येक पक्षाला कार्यकर्त्यांना सुखी समाधानी ठेवावे लागते. राज्याच्या विद्यमान उपमुख्यमंत्री आणि अर्थमंत्र्यांनी गेल्या सरकारमध्ये सत्ताधारी पक्षातील मुख्य पक्षाच्या आमदारांनाच अल्प निधी ठेवला, मुख्य पक्षाच्या मंत्र्यांच्या खात्यांना कमी निधी दिला अशी हवा करून शिवसेना पक्ष संभ्रमित करण्यात किंवा त्यांच्यात खळबळ निर्माण करण्यात तत्कालीन विरोधी पक्ष नेते म्हणून देवेंद्र फडणवीस यशस्वी झाले होते. ठाकरेंप्रमाणेच आज सुद्धा फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील सरकारमधील मंत्री, आमदारांची चढाओढ निधीसाठीच सुरू असलेली दिसते.

महापालिका आणि सरकार यांच्या विकास आराखडा आणि अर्थसंकल्पात काही संबंध राहत नाही असे मुख्यमंत्री म्हणत असले तरी तो राज्य सरकारच्या अर्थसंकल्पातही डोकावतो. ज्यांनी निधी खर्चाचा तोल ठेवायचा त्या अधिकाऱ्यांच्यावर आणला जाणारा दबाव हा यात विचारात घेण्यासारखा आहे. तसेच दुसऱ्या बाजुला आज राज्यातील अनेक स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये प्रशासक राज आहे, मात्र तरीही प्रशासकीय अधिकाऱ्यांना केवळ ठराविक कामांमध्येच का रुची आहे? हे मुख्यमंत्रीही जाणतात. ही खोड केवळ लोकप्रतिनिधींना नव्हे तर प्रशासकांनाही लागली आहे. अनेक मोठ्या प्रकल्पात शासकीय अधिकारी कॉन्ट्रॅक्टर बरोबर पार्टनर होत आहेत आणि तिथे मिळवलेला काळा पैसा तिथल्याच बिल्डर आणि जमीन व्यवहारात ते गुंतवत आहेत. या प्रशासकांकडेही अनावश्यक खर्च वाढत चालला आहे. त्यामुळे शहरे विकसित करण्याचे त्यांचे धोरण प्रत्यक्षात रस्त्यावर अनावश्यक दिव्यांची रांग आणि रंगीबेरंगी लाइटिंगचा खर्च यापुढे गेलेला नाही. ड्रेनेजची सुविधा, नाल्यांचे प्रश्न, पाण्याचे शुद्धीकरण, क्रीडांगणे, बागांची निर्मिती, वैद्यकीय सुविधा या सगळ्या खर्चिक आणि उपयुक्त ठरणाऱ्या कामाच्या बाबतीत दिरंगाई किंवा निकृष्ट कामच दिसते. त्यामुळे विकासाचे दीपस्तंभ जिथे पाहायला मिळावेत तिथे थडगी दिसत आहेत. या थडग्यात लोकप्रतिनिधी आणि आमदारांनी मिळून गाडलेल्या विकासाला बाहेर खेचून जिवंत करण्याची जबाबदारी आता नियतीने फडणवीस यांच्यावरच सोपवली आहे. त्यात ते यशस्वी होवोत याच त्यांना शुभेच्छा.

## स्थानिक गुन्हे शाखेचे पो. नि. पंकज जाधव यांना पोलीस महासंचालकांचे सन्मानचिन्ह जाहिर



**जालना । प्रतिनिधी**

**स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरिक्षक पंकज जाधव आणि फौजदार श्री वाघ यांना पोलीस महासंचालकांचे सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्र जाहिर झाले आहे.**

यासंदर्भातील आदेश पोलीस महासंचालक रश्मि शुक्ला यांनी जारी केले आहेत.

राज्य शासनाच्या निर्णयानुसार पोलीस दलातील विविध प्रवर्गातील उत्तम कामगिरी करणारे आणि राष्ट्रपतींचे गुणवत्तापुर्ण सेवापदक तसेच शौर्य पदकप्राप्त पोलीस अधिकारी –अंमलदारांना सन्मानचिन्ह प्रदान करण्याचा प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात आला होता. या प्रस्तावाला मंजुरी मिळाल्याने पोलीस महासंचालक रश्मि शुक्ला यांनी राज्यातील ८०० अधिकारी आणि अंमलदारांना पोलीस महासंचालकांचे सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्र प्रदान करण्याची घोषणा केली आहे. यामध्ये जालना येथील स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरिक्षक पंकज जाधव आणि फौजदार वाघ यांचा समावेश आहे.

# बिश्नोई गँगचे पाच शूटर्स पोलिसांच्या ताब्यात

## मुंबईचा मोठा व्यापारी रडारवर असल्याचा खळबळजनक खुलासा

**मुंबई । प्रतिनिधी**

**मुंबई पोलिसांनी अंधेरी परिसरातून पाच शूटरर्संना अटक केली असून या आरोपींपैकी एक आरोपी बिश्नोई गँगच्या संपर्कात असल्याचा पोलिस तपासात खुलासा झाला आहे. या पाच आरोपींकडून पोलिसांनी सात बंदूक आणि २१ जिवंत काडतुसे जप्त केली आहेत. अभिनेता सलमान खानच्या जीवे मारण्याची धमकी देऊन त्याच्या घरावर गोळीबार केल्यापासून बिश्नोई गँग देशभरात चर्चेत आहे. आता या शुटर्सपैकी एकाचे कनेक्शन बिश्नोई टोळीशी असल्याचे समोर आल्याने पोलिसांनी त्यादिशेने तपासाची चक्रे फिरवली आहेत.**




या शुटर्सचे टार्गेट मुंबईतील एक बडा व्यापारी असल्याची शक्यता वर्तवली जात आहे. हा व्यापारी कोण व खंडणीसाठी की त्याची हत्या करण्यासाठी त्याचे नाव या शूटर्सकडे आले होते याचाही तपास आता पोलिस करत आहेत. याबाबत सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार अटक केलेल्या पैकी एक आरोपी विकास ठाकूरने चौकशी दरम्यान खुलासा केला आहे की तो बिश्नोई गँगच्या संपर्कात होता. लॉरेन्स बिश्नोईचा भाऊ अनमोल बिश्नोई याच्या आदेशानंतर हे पाच शूटर्स मुंबईत आले होते का? याचा तपास पोलीस करत आहेत. मुंबईत त्यांना एक मोठं कॉन्ट्रॅक्टदेखील भेटले होते अशी माहितीही तपासादरम्यान समोर आली आहे. मुंबईमध्ये दाखल झाल्यानंतर कोणावर हल्ला करायचा आहे. त्या संदर्भात माहिती बिश्नोई गँगकडून भेटणार होती. मात्र त्याआधीच पोलिसांनी त्यांना ताब्यात घेतले. दरम्यान, या हल्ल्यानंतर या पाच जणांना ५० लाख रुपये देण्याचे आश्वासनदेखील दिले गेले होते. मात्र या व्यापाऱ्याची सुपारी त्यांना कोणी दिली याचा खुलासा अद्याप झालेला नाही. त्यांचा प्लॅन यशस्वी होण्याआधीच पोलिसांनी त्यांना बेड्या ठोकल्या. अभिनेता सलमान खान आणि त्याचे वडील सलीम खान यांची प्रसिद्ध गायक सिध्दू मुसेवाला याच्याप्रमाणे हत्या घडवून आणली जाईल, अशा आशयाचे पत्र जून २०२२ मध्ये सलमानच्या घराजवळ सापडले होते. त्यानंतर सलमान खानच्या घरावर बिश्नोई टोळीच्या शूटर्संनी गोळीबार केला होता. सध्या तिहार जेलमधून गँगचा प्रमुख लॉरेन्स बिश्नोई गँग चालवत असतो. तसेच कॅनडामधून त्याच्या गँग चालवली जाते.




बीडः भगवान परशुराम जन्मोत्सवानिमित्त प्रतिमा पूजन करताना परशुराम जन्मोत्सव संस्थापक अध्यक्ष अ‍ॅड अक्षय कुलकर्णी(भालेराव) अ‍ॅड रवी सर देशमुख,अ‍ॅड समीर पतोदकर विनायक वझे सर विनायक जोशी सर अमृतचे विशाल जोशी,अमृत सहव्यवस्थापक सुमित धिर्डे रोहित कुलकर्णी, रेणूकादास व्यास,अक्षय देशपांडे, ओंकार कारीकर, वैभव जोशी, संदीप पालसिंगनकर,संदेश देवळे,मुकुंद पाटील,ज्ञानेश पाटील, इ परशुराम भक्त

## कालीका स्टील्स'ला 'सीएमआयए अवॉर्ड्स 'सस्टेनेबिलिटी व पर्यावरण उत्पादन' पुरस्कार



जालना । प्रतिनिधी

भारतातील एक अग्रगण्य स्टील उत्पादक कंपनी असलेल्या 'कालीका स्टील्स'ला 'सीएमआयए २०२५' पुरस्कारांमध्ये 'सस्टेनेबिलिटी व पर्यावरण जाणीवपूर्वक उत्पादन' या श्रेणीत गौरवण्यात आले. हा पुरस्कार २७ एप्रिल २०२५ रोजी मा. मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते प्रदान .

१५० हून अधिक अर्जदारांची सखोल तपासणी व मुलाखतीनंतर पाच तज्ज्ञांच्या स्वतंत्र परीक्षक समितीने कालीका स्टील्सची निवड केली. पुरस्कार स्विकारताना श्री. घनश्याम गोयल, श्री. अनुज बन्सल आणि श्री. यश गोयल उपस्थित होते. दोन दशकांहून अधिक उत्पादन उत्कृष्टतेचा वारसा असलेल्या कालीका स्टील्सने पर्यावरण संरक्षणासाठी 'शून्य नि:सारण' धोरण अवलंबले आहे. त्यांच्या पर्यावरणीय व सामाजिक बांधिलकीच्या कार्याला मिळालेल्या या सन्मानामुळे औद्योगिक क्षेत्रात विशेष आनंद व्यक्त होत आहे.

## येवलवाडीच्या सरपंचांवर अविश्वासठराव; ग्रामसभेमध्ये अर्धे मतदान मोजत गटविकास अधिकाऱ्यांनी घेतला काढता पाय

# गटविकास अधिकाऱ्यांवर राजकीय दबाव असल्याची चर्चा

**पाटोदा । प्रतिनिधी**

**पाटोदा तालुक्यातील येवलवाडी ग्रामपंचायतीच्या सरपंच विजया नागरगोजे यांच्यावर अविश्वासाचा ठराव आणण्यात आला. या ठरावासाठी काल ग्रामसभेचे आयोजन करण्यात आले होते. मात्र, गुप्त मतदानाऐवजी गटविकास अधिकारी प्रवीण वानखेडे यांनी खुले मतदान घेण्याचा निर्णय घेतल्यामुळे गावात लोकशाही प्रक्रिया आणि संविधानाची खिल्ली उडवण्यात आल्याची भावना नागरिकांमध्ये निर्माण झाली आहे.**

या प्रकारामुळे येवलवाडी गावात गेल्या पंधरा दिवसापासून तणावाचे वातावरण निर्माण झाले असून नागरिकांमध्ये संतापाचे वातावरण आहे. काही ग्रामस्थांनी या निर्णयाला तीव्र विरोध दर्शवला आहे.





स्थानिक प्रशासनाने नियंत्रणात ठेवण्यासाठी कोणतीही ठोस कारवाई केली नसल्याची माहिती मिळत आहे. या घटनेमुळे गावकऱ्यांमध्ये गोंधळ निर्माण झाला असून लोकशाही प्रक्रियेवर विश्वास ठेवणाऱ्या नागरिकांनी गटविकास अधिकाऱ्यांच्या निर्णयाचा निषेध केला आहे. प्रशासनाने याप्रकरणी योग्य ती चौकशी करून कारवाई करावी, अशी मागणी केली असून. दरम्यान दुपारी दोन वाजता गटविकास अधिकारी वानखेडे यांनी. सर गिनो पद्धतीने मतदान घेण्याचे ठरवले तशी प्रक्रिया त्यांनी चालू केली . साडेचारशे लोकांनी मतदान करण्यासाठी संमती दिली. यावेळी १८५ लोकांनी पूर्वीचे सरपंच नागरगोजे यांना पसंती दर्शवली. सरपंच यांच्या विरोधामध्ये २२५ मतदान होते. पण ऐनवेळी. पंचायत समितीचे गटविकास अधिकारी प्रवीण वानखेडे यांनी. पूर्वीचे सरपंच नागरगोजे यांच्या विरोधातील.मतदान मोजण्यास असमर्थता दर्शवली. यामुळे एकच गोंधळ उडाला असून. मतदान न मोजल्यामुळे. नेमका निर्णय काय झाला हे सर्व संभ्रमामध्ये आहे. तेथील सर्व सोयीस्कर उरकून पंचायत समितीचे अधिकारी वानखेडे हे पंचायत समिती येथे आले व त्यांनी मी पंचायत समितीमध्ये आल्यानंतर निर्णय देतो असे सांगितले . यावेळी येवलवाडी येथील ग्रामस्थ पंचायत समिती येथे गेले असता. सदर अधिकारी हे गायब असल्याचे दिसले. यामुळे येवलवाडीच्या या प्रकारामध्ये लोकशाहीची खिल्ली उडवली गेली असे सर्वसामान्य जनतेमध्ये चर्चा आहे. तर कुठलाही निर्णय झाले नसल्याची चर्चा सुद्धा चालू आहे. तर गटविकास अधिकारी यांनी दबावत काम केले असून. यामध्ये लोकशाहीची खिल्ली उडवली आहे असा आरोप ग्रामस्थांकडून होत आहे. ठरावाला ग्रामसभेची मंजुरी घेण्यासाठी गुप्त मतदाना ऐवजी खुले मतदान घेण्यासाठी गटविकास अधिकारी प्रवीण वानखेडे यांनी लोकशाहीची थट्टा लावत संविधानाला बट्टा लावण्याच काम केलं आहे. त्यामुळे गावात तणावाचं बातावरण निर्माण झाला आहे. मिळालेल्या अधिकाराचा गैरवापर करत संविधान आणि लोक मताचा अनादर करण्याचा चंग यावेळी गटविकास अधिकारी यांच्याकडून झाला आहे. सदर येवलवाडी येथे ग्रामसभा सूर असतांना गटविकास अधिकारी वानखेडे यांना वारंवार फोन येत होते. हे नेमके कोण कोणाची येत होते कोण राजकीय दबाव टाकत आहे क्या फोनवरती आलेल्या माणसाची संभाषण ऐकून तर गतविकास अधिकारी कारवाई करत नाही ना अशी चर्चा सर्वत्र होती.

## पान १वरून...

### शेतीतील पायाभूत सुविधा निर्मितीसाठी

करण्यात येणार आहे. तर या योजनेचं तृतीय पक्षाव्दारे (थर्ड पार्टी) मूल्यमापन करण्यासाठी १ टक्के राखीव निधी ठेवण्यास मंत्रिमंडळाने मान्यता दिली आहे. दरम्यान, पीक विमा योजनेत गैरव्यवहारांचं प्रकरण समोर आल्याने राज्य सरकारने १ रुपयांत पीक विमा योजना बंद करण्याचा निर्णय घेतला. तसेच पीक विमा भरपाईमध्ये नुकसान भरपाईच्या निकषात बदलास मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता दिली आहे.

----------

### पंतप्रधान मोदी यांच्या अध्यक्षतेखाली

सरकारची सर्वोच्च निर्णय घेणारी संस्था ही बैठक होणार आहे. जम्मू आणि काश्मीरमधील सुरक्षा परिस्थितीची माहिती वरिष्ठ संरक्षण अधिकाऱ्यांनी सोमवारी पंतप्रधान मोदींना दिली. २२ एप्रिल रोजी झालेल्या दहशतवादी हल्ल्यामागील लोकांना शिक्षा करण्याचे पर्याय वरिष्ठ संरक्षण अधिकाऱ्यांनी विचारात घेतले. हा हल्ला अलिकडच्या काळात नागरिकांवर झालेल्या सर्वात घातक हल्ल्यांपैकी एक असल्याचे म्हटले जाते.

------------

### सुशिल सोळंके यांचा अटकपूर्व

त्याच्या भावाने ग्रामपंचायत निवडणुकीत आरोपीच्या आई विरोधात प्रचार केला होता. फिर्यादीने ग्रामपंचायत कारभाराविरुध्द उपोषण केले होते. तू आमच्या विरोधात उपोषण का करतोस या कारणास्तव आरोपीतांनी फिर्यादीच्या दुकानात बेकायदेशिररित्या प्रवेश करुन त्याला मारहाण केली व दुकानातील वस्तुंची मोडतोड करुन नुकसान केले. या प्रकरणात फिर्यादीतर्फे अ‍ॅड. सुदर्शन जी. साळुंके व अ‍ॅड. अमोल गायकवाड यांनी काम पाहिले तर सरकारतर्फे अ‍ॅड. एन.बी. पाटील यांनी काम पाहिले.

----------

### कॉमनवेल्थ गेम्स घोटाळ्यात सुरेश

त्यांच्या सहकाऱ्यांवर करण्यात आला होता. कलमाडी हे या स्पर्धांच्या आयोजन समितीचे अध्यक्ष होते. त्यांच्यासह सरचिटणीस ललित भानोत, कार्यकारी अधिकारी विजयकुमार गौतम, कोषाध्यक्ष ए. के. मट्टो आणि कंपनीचे क्रेग गॉर्डन मेलॅचाय यांच्यावर गंभीर आरोप लावण्यात आले होते.

------------

### रियल इस्टेट डेव्हलपर्स आणि

यमुना एक्सप्रेसवे, गुरुग्राम आणि गाझियाबादच्या लगतच्या भागातील इतर बांधकाम व्यावसायिकांच्या प्रकल्पांना व्यापेल.

------------

### खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर

उपलब्धता, हवामान व जलाशयाची स्थिती याची माहिती कृषिमंत्र्यांनी घेतली. यावेळी अधिकाऱ्यांनी मागील वर्षीच्या तुलनेत जलाशयाची पाणीपातळी सुधारल्याचं सांगितलं. देशातील १६१ जलाशयामध्ये उपलब्ध पाणी साठा मागील वर्षीच्या तुलनेत ११८ टक्के आहे. तर मागील १० वर्षीच्या सरासरी तुलनेत ११९ टक्के असल्याचं अधिकाऱ्यांनी सांगितलं आहे. तसेच बागायत क्षेत्रात वाढ झाल्याचा दावा एनएचबीकडून करण्यात आला. यावेळी टोमॅटोसह नाशवंत पिकांसाठी शेतकऱ्यांना योग्य दर मिळावेत, यासाठी उपाययोजना करण्याचे निर्देश कृषिमंत्र्यांनी दिले.

---------

### कॅबिनेटमंत्री राधाकृष्ण विखे पाटलांसह

प्रवरा कारखान्याचे सभासद बाळासाहेब केरूनाथ विखे यांनी थेट सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली होती. अखेर, सुप्रीम कोर्टाच्या आदेशानंतर विखे पाटलांसह पाटलांसह ५४ जणांवर भादंस कलम ४१५,४२०,४६४, ४६५ कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला.

---------

# पाटोदा नगरपंचायतने रमाई घरकुल अनुदान थकवले; लाभार्थी किशोर उपदेशींचा १ मे महाराष्ट्र दिनी आत्मदहनाचा इशारा

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा नगरपंचायतने रमाई योजने अंतर्गत घरकुल मंजूर झालेले घरकुल बांधूनही लाभार्थ्याला अद्याप अनुदानाची अंतिम रक्कम न दिल्याने संतप्त झालेल्या किशोर उपदेशी यांनी थेट आत्मदहनाचा इशारा दिला आहे. त्यांनी आपल्या निवेदनात १ मे २०२५ रोजी महाराष्ट्र दिनाच्या दिवशी पाटोदा नगरपंचायती समोर आत्मदहन करण्याचा इशारा निवेदनाद्वारे दिला असून,यास पूर्णतः जबाबदार नगरपंचायत प्रशासन असेल, असे स्पष्ट लिहिले आहे.किशोर उपदेशी यांनी आपल्या निवेदनात म्हटले आहे की, ''रमाई घरकुल योजना अंतर्गत मला मंजूर झालेले घरकुल मी नियमाप्रमाणे पूर्ण केले आहे. मात्र, वेळोवेळी पाठपुरावा करूनही नगरपंचायत प्रशासन माझ्या खात्यावर अनुदानाची रक्कम जमा करत नाही. त्यामुळे मी आर्थिक अडचणीत सापडलो असून मानसिक तणावाखाली आहे.''

या प्रकरणामुळे पाटोदा परिसरात खळबळ उडाली असून नागरिकांमध्ये संतापाचे वातावरण आहे.''गरिबांसाठी राबवण्यात येणाऱ्या योजनांचा लाभ वेळेवर मिळत नसेल, तर प्रशासनाचे अपयश अधोरेखित होते,'' अशा प्रतिक्रिया किशोर उपदेशीं यांनी दिल्या आहे.

राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

बुधवार, दि. ३० एप्रिल २०२५



# जिल्हाध्यक्ष पदाची निवडणूक लोकशाही मार्गाने पार पडेल-राहुल लोणीकर

जालना । प्रतिनिधी

**भारतीय जनता पक्षाने जिल्हाध्यक्ष पदाच्या निवडीसाठी इच्छुक उमेदवारास प्रथमच वयाची अट व इतर निकष लागू करण्यात आले आहेत तसेच निवड प्रक्रियेतही मोठ्या प्रमाणात बदल करण्यात आला आहे. जिल्हाध्यक्ष पदासाठी ४५ ते ६० अशी वयाची अट लागू करण्यात आली आहे. नवीन पक्षप्रवेश झालेल्या कार्यकर्त्याचा जिल्हाध्यक्ष पदासाठी विचार केला जाणार नाही तसेच आमदार किंवा खासदाराचीही जिल्हाध्यक्ष म्हणून नियुक्ती होणार नाही, असे नवे निकष लागू करण्यात आले आहेत. महाराष्ट्रभर या नवीन निकषानुसार निवड प्रक्रिया सुरू करण्यात आली असून भाजप लातूर शहर जिल्हाध्यक्ष पदाची निवडणूक पारदर्शी आणि लोकशाही मार्गाने पार पडेल असे प्रतिपादन भाजपा महाराष्ट्र प्रदेश सचिव तथा लातूर शहर जिल्हा भाजपा निवडणूक निरीक्षक श्री राहुल लोणीकर यांनी केले.**

भाजपा लातूर शहर जिल्हाध्यक्ष पदाच्या निवडी संदर्भात आयोजित महत्त्वपूर्ण बैठकीसाठी भाजप महाराष्ट्र प्रदेश सचिव राहुल लोणीकर यांना पक्ष निरीक्षक म्हणून जबाबदारी देण्यात आली होती या बैठकी प्रसंगी माजी मंत्री आमदार संभाजी पाटील निलंगेकर, आमदार रमेश कराड, डॉ. अर्चना पाटील चाकूरकर, माजी आमदार शिवाजीराव पाटील कव्हेकर, दत्तराव कुलकर्णी, जिल्हाध्यक्ष देविदास काळे, माजी जिल्हाध्यक्ष गुरुनाथ मगे शैलेश लाहोटी, मनपा विरोधी पक्षनेते शैलेश गोजमगुंडे, अजित कव्हेकर, प्रेरणा होनराव, दत्ता चेवले, रवी केंद्रे यांची प्रमुख उपस्थिती होती. भाजपने यंदा हे वर्ष संघटन पर्व म्हणून जाहीर केले आहे. सदस्य नोंदणीची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर मंडलाध्यक्ष, जिल्हाध्यक्ष पदाची निवड प्रक्रिया सध्या सुरू आहे. जिल्हाध्यक्ष पदासाठी इच्छुक उमेदवारास वयाची अट लागू करतानाच इच्छुक उमेदवाराने यापूर्वी संघटनेत जबाबदारीच्या पदावर काम केलेले असावे, दोन टर्म सक्रिय सदस्य असलाच पाहिजे, महिला- एससी-एसटी यांची नावे मंडल पातळीवरून आली पाहिजेत. अनुशासित व प्रामाणिक व्यवहार करणारा असावा, असे निकष लागू केले आहेत.



पूर्वी निवड प्रक्रिया प्रदेश पातळीवर नियुक्त केलेल्या निरीक्षकांमार्फत इच्छुकांच्या मुलाखत घेऊन राबवली जात होती. मात्र आता मुलाखती टाळण्यात आल्या आहेत. त्याऐवजी संघटनेत काम करणाऱ्या ठरावीक पदाधिकाऱ्यांना शिफारस करण्यास सांगण्यात आले आहे, याची यादीही निवडणूक निरीक्षकांना प्रदेशकडून दिली गेली आहे. ही शिफारस करताना इच्छुक कसा पात्र आहे, हे प्रपत्रात नमूद करायचे आहे. असेही राहुल लोणीकर यांनी यावेळी स्पष्ट केले. जिल्हाध्यक्ष पदासाठी तेथील रहिवासी असलेले राष्ट्रीय व प्रदेश पदाधिकारी, प्रदेश कोअर ग्रुप सदस्य, विभाग संघटन मंत्री, मोर्चाचे पदाधिकारी, राज्यसभा व लोकसभेचे खासदार, माजी खासदार, आमदार, माजी आमदार, विधानसभा लढलेले उमेदवार, विद्यमान जिल्हाध्यक्ष, माजी जिल्हाध्यक्ष जिल्हा सरचिटणीस, प्रकोष्ट पदाधिकारी, प्रवासी कार्यकर्ते यांना शिफारस करण्याचे अधिकार देण्यात आले आहेत. संघटना चालवण्यासाठी अनुभवी कार्यकर्ता असावा, यातून हे निकष लागू करण्यात आले असून या नव्या निकषामुळे निष्ठावानांना नक्की न्याय व बळ मिळेल असेही यावेळी राहुल लोणीकर यांनी स्पष्ट केले. यावेळी रवी सूडे प्रदीप मोरे मीनाताई भोसले दिग्विजय काथवटे शिरीष कुलकर्णी प्रवीण सावंत गणेश गोमचाळे रागिणी यादव निखिल गायकवाड दुर्गेश चव्हाण यांच्यासह भारतीय जनता पक्षाचे आजी व माजी मंडल अध्यक्ष, युवा मोर्चा महिला आघाडी अल्पसंख्यांक आघाडी चे जिल्हा व मंडल स्तरावरील पदाधिकारी यांच्यासह मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# लोक सेवा हक्क अधिनियमनिमित्त महानगरपालिकेत विशेष कार्यक्रम

जालना । प्रतिनिधी

**महाराष्ट्र राज्य लोक सेवा हक्क अधिनियम २०१५ दशकपूर्ती निमित्त्य जालना शहर महानगरपालिकेत विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.**



महाराष्ट्र राज्य लोकसेवा हक्क आयोग २०१५ या कायदयास दि. २८ एप्रिल रोजी १० वर्ष पूर्ण झाल्याच्या निमित्ताने जालना शहर महानगरपालिकाच्या वतीने मा. आयुक्त तथा प्रशासक संतोष खांडेकर, यांचे प्रमुख उपस्थित सर्व अधिकारी कर्मचारी यांना महाराष्ट्र राज्य लोक सेवा हक्क अधिनियमा बाबत शपथ देण्यात आली. अतिरीक्त आयुक्त प्रियंका राजपूत यांनी महाराष्ट्र राज्य लोक सेवा हक्क अधिनियम २०१५ बाबत सविस्तर मार्गदर्शन केले तर मा.आयुक्त तथा प्रशासक संतोष खांडेकर यांनी सेवा हक्क अधिनियम २०१५ सह इतर कार्यालयीन कामकाजाबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. महाराष्ट्र राज्य लोक सेवा हक्का कायदया अंतर्गत उत्कृष्ट कार्य करणा-या सहा.आयुक्त अनुराधा नागोरी, लिपीक रंजना दानेकर व अनिता मालोदे (वाघमारे) यांचा प्रमाणपत्र देवुन गौरव करण्यात आला जन्म मृत्यु, जन्म नांवात दुरुस्ती इत्यादीसाठी नागरीकाच्या येणा-या अर्जासाठी यापूढे टोकन व्यवस्था करण्यात आली आहे. सदर टोकन व्यवस्था आज मा.आयुक्त, मा.अतिरिक्त आयुक्त, मा.उपायुक्त यांचे हस्ते सुरुवात करण्यात आली. सर्व सेवा विहित वेळेत व मुदतीत पात्र नागरीकांना मिळाण्यासाठी मनपा कार्यालयात सेतु सुविधा केंद्राची सुरुवात करण्यात आली, तर सर्व नागरीकांना मनपाच्या वतीने देण्यात येणा-या सेवा त्यांचे शुल्क पाहता यावे व ऑन लाईन पध्दतीने अर्ज करता यावे, तसेच तक्रार करता यावी यासाठी मनपा कार्यालयात आणि विविध चौकात बॅनरव्दारे प्रसिध्द करण्यात आलेले आहे. सर्व सेवा विषयक माहिती करीता मनपा कार्यालयात डिजीटल बोर्डचे उदघाटन करण्यात आलेले आहे.।वेळी मा.अतिरीक्त आयुक्त प्रियंका राजपूत, उपायुक्त नंदा गायकवाड, मुख्य लेखाधिकारी भिसे, मुख्य लेखापरिक्षक निंबाळकर, सहा.आयुक्त अपर्णा जाधव, सुप्रिया चव्हाण, अनुराधा नागोरी, केशव कानपूडे व सर्व विभाग प्रमुख व कर्मचारी यांची उपस्थिती होती.

# मुंबईत होणारी 'वेव्हज' परिषद मनोरंजन क्षेत्रातील गुंतवणुकीसाठी 'दावोस' ठरणार-उपमुख्यमंत्री शिंदे

मुंबई । प्रतिनिधी

**मुंबई बीकेसी येथील जिओ वर्ल्ड सेंटर येथे १ ते ४ मे दरम्यान 'वर्ल्ड ऑडिओ व्हिज्युअल एंटरटेनमेंट समिट'चा (वेव्हज) कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. या समिटच्या तयारीची पाहणी आज उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केली.**

वेव्हज २०२५ परिषद मुंबईत होतेय हे महाराष्ट्रासाठी गौरवास्पद आहे. जागतिकस्तरावर मनोरंजन क्षेत्रातील गुंतवणुकीसाठी ही परिषद 'दावोस' ठरणार असल्याचे उपमुख्यमंत्र्यांनी सांगितले.

दुपारी तीनच्या सुमारास उपमुख्यमंत्री श्री. शिंदे यांनी जिओ वर्ल्ड सेंटरला भेट दिली. यावेळी मुंबई महापालिका आयुक्त भूषण गगराणी, उपमुख्यमंत्र्यांचे अपर मुख्य सचिव असीम गुप्ता, प्रधान सचिव नविन सोना, उद्योग विभागाचे प्रधान सचिव श्री.अनबलगन, एमआयडीसीचे मुख्य कार्यकारी अधिकारी पी. वेलारसु आदी यावेळी उपस्थित होते. यावेळी परिषदेबाबत सादरीकरण करण्यात आले. या कार्यक्रमाचे यजमानपद महाराष्ट्र शासनाला मिळाले ही अभिमानाची बाब असून असून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली हे आयोजन होत आहे असे सांगत उपमुख्यमंत्री श्री. शिंदे म्हणाले, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या दुरदृष्टीतून ही परिषद साकार होत आहे. विशेष म्हणजे प्रधानमंत्री श्री. मोदी १ मे रोजी संपूर्ण दिवसभर मुंबईत उपस्थित राहणार आहेत.भारत जगात आघाडीवर आहे हे सिद्ध करण्यासाठी ही परिषद महत्वाची असून मुंबई हे देशाचे ग्रोथ इंजिन आहे तसेच मिडिया आणि मनोरंजनाचे हे केंद्र असल्याने या परिषदेमुळे मनोरंजन क्षेत्राला तांत्रिकदृष्ट्या नवी ओळख मिळणार असल्याचे उपमुख्यमंत्र्यांनी सांगितले. या परिषदेमुळे आंतरराष्ट्रीय स्टुडिओज, प्रोडक्शन हाऊसेस, टेक कंपन्यांची भागीदारीची याची दारे खुली होतील असेही ते म्हणाले.



उपमुख्यमंत्र्यांकडून परिषदेच्या तयारीची पाहणी

पान ६ वरून...

### निराधार वयोवृद्धांना

जीवनमान अवलंबुन असते. त्यांच्या औषधांचा खर्च देखील त्याच मानधनावर अवलंबून असल्याचे अनेक जेष्ठ नागरिक बोलून दाखवत आहेत. त्यांच्या वयामुळे आणि आयुष्यभर केलेल्या काबाड कष्टामुळे त्यांच्या हातावरील रेषा या धूसर झाल्या आहेत. धूसर रेषामुळे त्यांचे हात साफ झाल्याने त्यांच्या हाताच्या बोटाचे ठसे उमटत नसल्याने त्यांची केवायसी होण्यास मोठी अडचण निर्माण होत आहे. त्यामुळे त्यांना पैसे किंवा मानधनापासून वंचित रहावे लागत आहे. पर्यायाने त्यांच्यावर उपासमारीची वेळ ओढावत आहे. अनेक जेष्ठ नागरिकावर भीक मागुन जगण्याची नामुष्की ओढवल्याचे चित्र पहावयास मिळत आहे. तहसील कार्यालय तथा विविध खाजगी तसेच शासकीय बँकामध्ये अनेक जेष्ठ नागरिक आपली कागदपत्रे घेवून अधिकाऱ्यांची मनधरणी करत असल्याचे दिसून येत आहे. शेकडो जेष्ठ नागरिकांची यामुळे परवड होत आहे याकडे माय बाप अधिकारी किंवा सरकार आमच्याकडे लक्ष देईल का अशी आर्त विनवणी या जेष्ठ निराधार तसेच श्रावण बाळ योजनेतील शेकडो नागरिक करतांना आढळून येत आहेत. या संदर्भात तहसीलदार यांच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला परंतु संपर्क होऊ शकला नाही

### मोटारसायकलवरुन मोबाईल

गुन्हयात वापरलेली स्प्लेंडर मोटार सायकल असा एकुण २,८७,०००/- रु चा मुद्देमाल जप्त करण्यात आलेला असुन आरोपींकडुन खालील नमुद उकल करण्यात स्था.गु.शा.पथकाला यश आले आहे. १) पो.स्टे.शिवाजीनगर गुरनं २१०/२०२५ कलम ३०९(४), ३(५) भा.न्या.सं.२) पो.स्टे.शिवाजीनगर गुरनं १६५/२०२५ कलम ३०४(४) भा.न्या.सं.३) पो.स्टे.बीड शहर गुरनं ४०/२०२५ कलम ३०३(२), भा.न्या.सं.४)

पो.स्टे.बीड शहर गुरनं ६७/२०२५ कलम ३०९(४), ३(५) भा.न्या.सं.सदर गुन्हयात एकुण तीन आरोपी निष्पन्न करण्यात आलेले असुन १) आदित्य बंकट नरवडे रा.बालेपीर व २) नामदेव रामप्रसाद डोईफोडे यांना पो.स्टे.शिवाजीनगर,बीड यांचे ताब्यात देण्यात आलेले आहे. त्यांचेकडुन मोबाईल चोरीचे आणखीन इतरही गुन्हे उघडकीस येण्याची शक्तता आहे. उर्वरित एक आरोपीचा शोध घेवुन त्यास अटक करण्याचे प्रयत्न चालु आहे. सदरची कामगिरी श्री. नवनित काँवत पोलीस अधीक्षक बीड, श्री. सचिन पांडकर अपर पोलीस अधीक्षक बीड, श्री. उस्मान शेख पोलीस निरीक्षक स्थानिक गुन्हे शाखा,बीड यांचे मार्गदर्शनाखाली पोउपनि सुशांत सुतळे पोह/मारुती कांबळे, पोह/विकास राठोड, बाळकृष्ण जायभाये, देविदास जमदाडे, पोशि/ नारायण कोरडे, अश्विनकुमार सुरवसे, चापोह/नितीन वडमारे यांनी मिळुन केली आहे.

### आर बी आय आणि

कार्यकारी अधिकारी एम आर क्षीरसागर ,बँकेचे सर व्यवस्थापक, एम एस शेख, कुंबेफळकर सहाय्यक व्यवस्थापक,वरिष्ठ व कनिष्ठ अधिकारी,व सर्व कर्मचारी,संचालक मंडळ , स्थानिक सल्लागार समितीचे सदस्य,इतर बँकेचे सीओ, आदर्श शिक्षण संस्थेचे प्रशासक राजा मचाले एस के एच मेडिकल कॉलेजचे प्राचार्य भस्मे सर, ग्राहक,सर्व सभासद,खातेदार उपस्थित होते सदर कार्यशाळा रिझर्व बँकेचे सहाय्यक व्यवस्थापक मनोज व मॅडम यांनी सायबर सेक्युरिटी का आवश्यक आहे व त्यावर उपाययोजना काय करावी याबद्दल सविस्तर माहिती उदाहरणासह सांगितले आहे तसेच सायबर क्राईम पासून बँकांनी सावध कसे राहायला पाहिजे त्याबद्दल सविस्तर माहिती सांगितली.सदर कार्यशाळा खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली आभार प्रदर्शन बँकेचे संचालक तागडे यांनी केले आहे

### ४५% शेतकऱ्यांची

नोंदणीचे आव्हान केले जात आहे सेतू सुविधा केंद्र मध्ये हिंदूंनी मोफत असताना देखील फार्मर आयडी संदर्भात शेतकरी उदासी नाहीत या पार्श्वभूमीवर तहसील प्रशासनाने गावी गावी शिबिर घेऊन जनजागृती मोहीम सुरू केली आहे कृषी क्षेत्रातील विविध महत्वकांक्षी योजनेचा लाभ घेण्यासाठी फार्मर आयडी आवश्यक असल्याने उर्वरित शेतकऱ्यांनी तातडीचे नोंदणी करावी असे आव्हान तहसीलदार दत्तात्रय निरवाडे यांनी केले आहे मंडळ अधिकारी व तलाठ्या मार्फत थेट गाव पातळीवर संपर्क साधून विशेष शिबिरे आयोजित केली जात आहेत असे नायब तहसीलदार एन एन मुळे यांनी सांगितले.



## महासांगवी येथे अजब प्रकार एका बटाट्याला तीन ते चार बटाटे

**पाटोदा । प्रतिनिधी**

दिनांक २९ ४ २०२५ रोजी महा सांगवी तालुका पाटोदा जि बीड कृषी क्षेत्रामध्ये नवीन प्रकार बटाटे लागवड केली असतात्या ठिकाणी अशा प्रकारचे भरपूर बटाटे निघालेले आहेत खायला चविष्ट गोड रुचकर आणि विशेष म्हणजे सेंद्रिय पद्धतीने बनवलेले रासायनिक किमी केली कसलेही वापर न केलेले शेतकरी संतोष गर्जे

# वडवणीत आज होणाऱ्या भीम जयंती मिरवणुकीला हजारोंच्या संख्येने उपस्थित रहा-राहुल घाडगे

वडवणी । प्रतिनिधी

विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंती निमित्त वडवणी येथील सार्वजनिक जयंती उत्सव समितीच्या वतीने डॉ. आंबेडकर यांच्या प्रतिमेची भव्य - दिव्य व आकर्षक देखाव्यासह आज दि. ३० एप्रिल २०२५ रोजी मिरवणूक निघणार आहे. तरी या मिरवणुकीला वडवणी शहरासह तालुक्यातील आणि बीड जिल्ह्यातील भीम अनुयायानी हजारोंच्या संख्येने उपस्थित राहावे. असे आव्हान जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष व वडवणी नगरपंचायतीचे नगरसेवक, युवा नेते राहुल घाडगे यांनी केले आहे.



वडवणी शहरातील सार्वजनिक भीम जयंती उत्सवा निमित्त विविध कार्यक्रम घेण्यात आले होते. यामध्ये दि.१४ एप्रिल रोजी सकाळी १० वा. अभिवादन अभिवादनाचा कार्यक्रम घेण्यात आला. यानंतर शहरासह पंचक्रोशीतील लोकांना स्नेही महाभोजन दिले आहे. तर दि. २२ एप्रिल रोजी सायंकाळी ७ वा. आंबेडकर चौक या ठिकाणी भीम गीताचे सुप्रसिद्ध गीतकार, संगीतकार आणि अभिनेता उत्कर्ष आनंद शिंदे यांचा भीम गीतांचा कार्यक्रम संपन्न झाला. तर आज दि. ३० एप्रिल २०२५ रोजी सायंकाळी ठीक ५.३० वा. डॉ. आंबेडकर यांच्या प्रतिमेची आकर्षण सजावटीमध्ये भव्य दिव्य मिरवणूक निघणार आहे.

**लोकशाहीर अण्णाभाऊ साठे चौकातून प्रारंभ तर विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकात समारोप होणार**

यादरम्यान राजकीय, समाजिक, संस्कृतिक व प्रशासनातील अधिकारी सह विविध क्षेत्रातील विविध मान्यवर उपस्थित राहुल डॉ. आंबेडकरांच्या प्रतिमेला अभिवादन करणार आहेत.तर ही मिरवणूक वडवणी शहरातील लोकशाहीर अण्णाभाऊ साठे चौक इथून प्रारंभ केला जाईल तर विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकात या मिरवणुकीचा समारोप करण्यात येणार आहे तर मिरवणुकीमध्ये देखील उपस्थित जनसमुदायांची सुरक्षेच्या संदर्भात गैरसोय होऊ नये म्हणून जयंती उत्सव समितीच्या वतीने जवळपास २०० जणांची स्वंयसेवकाची सुरक्षा रक्षक म्हणून निवड केली आहे. तरी या मिरवणुकीला वडवणी शहरासह तालुक्यातील व बीड जिल्ह्यातील भीम अनुयायांनी हजारोच्या संख्येने उपस्थित राहून या मिरवणुकीमध्ये सहभागी व्हावे असे आव्हान सार्वजनिक भीम जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष व वडवणी नगरपंचायतीचे नगरसेवक युवा नेते राहुल घाडगे यांच्यासह कार्याध्यक्ष-परमेश्वर उजगरे, उपध्यक्ष-बाबासाहेब वाघमारे, प्रशांत (लखन) उजगरे, समाधान उजगरे, दिलीप रोकडे, सचिव-अमोल मुरालीधर उजगरे, कोषाध्यक्ष-शाम सुधाकर उजगरे, संघटक-प्रज्वल उजगरे, अजिंक्य उजगरे, सहसंघटक- अमोल वाघमारे, युवराज उजगरे, सहसचिव-किरण उजगरे (आमदार), राज उजगरे, रामेश्वर पाटोळे यांच्यासह समाज बांधवांनी केले आहे.

# मदरश्याचा विद्यार्थी मराठी, इंग्रजी बोलू लागला -सज्जाद सय्यद

## जामिया इस्लामिया मदरश्याचा विद्यार्थी हस्सान अन्सारी तालुक्यातून शिष्यवृत्ती परीक्षेत प्रथम

पाटोदा । प्रतिनिधी

**पाटोदा येथील जामीया इस्लामिया बहरुल उलुम पाटोदा या मदरश्यातील विद्यार्थी व जामखेडच्या ताज मस्जिद चे धर्मगुरू कारी मुबीन अन्सारी यांचे चिरंजीव हस्सान अन्सारी याने सन २०२३ -२०२४ नुकत्याच झालेल्या शिष्यवृत्ती परीक्षेमध्ये जामखेड तालुक्यातून प्रथम क्रमांक पटकावला. या उल्लेखनीय यशाबद्दल मदरसा पाटोदा येथे त्याचा भव्य सत्कार करण्यात आला. सन २०२३ - २४ मध्ये वर्ग ८ वी च्या शिष्यवृत्ती परीक्षेत जामखेड तालुक्यातून प्रथम आलेला हस्सान अन्सारी याचा सत्कार करण्यात आला यावेळी सेवा सोसायटीचे संचालक सज्जाद सय्यद, अँड जब्बार पठाण अँड सय्यद वहाब सय्यद, सरफराज ,मौलाना पठाण अक्रम, हाजी सय्यद मजहर, पठाण बरकतखान प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते . या सत्कार साठी हस्सान चे वडील कारी मुबीन अन्सारी उपस्तीत होते.**

मौलाना पठाण अक्रम यांनी आपल्या भाषणात हस्सान अन्सारीच्या यशाचे कौतुक केले. आणि इतर विद्यार्थ्यांना देखील प्रेरणा घेण्याचे आवाहन केले.सेवा सोसायटीचे संचालक , सामाजिक कार्यकर्ते सय्यद सज्जाद यांनी बोलतांना सांगितले



की,मदरशा मध्ये मराठी, इंग्रजी, गणित विषयाचे चांगले शिक्षण दिले जाते.सातत्याने परिश्रम केल्यास कोणतीही मोठी कामगिरी शक्य आहे. अँड जब्बार पठाण यांनी सांगितले की, मुलांनी स्पर्धा परीक्षा च्या अभ्यास केला पाहिजे .त्या साठी लगणारे पुस्तक उपलब्ध करून देऊ व मदरसा मध्ये जे सहकार्य लागेल ते आम्ही करू असे सांगितले, अँड. सय्यद वहाब यांनी बोलतांना सांगितले, मुलांना धार्मिक शिक्षण बरोबर आधुनीक शिक्षण देखील गरजेचे आहे. मुलांनी चांगला अभ्यास केला पाहिजे या ठिकाणी जे सहकार्य लागेल ते आम्ही नक्कीच करू असे सांगितले. मुफ्ती जफर साहब यांनी पाटोदा मदरसा मध्ये मुलांची तयारी कशी करून घेतली जाते. याची माहिती सांगितली येथील विद्यार्थी मोठ्या पदावर जातील. अशी मला आशा आहे. तसेच हस्सान ला इंग्रजी विषयाचे शिक्षण देणारे सलीम तांबोळी सर यांचे हि सर्वांनी कौतुक केले. या वेळी प्रा. सचिन गायकवाड यांनी हस्सान अन्सारी यांचे कौतुक केले मुलांना मार्गदर्शन केले तसेच प्रमुख पाहुणे यांनी या ठिकाणी सर्व शिक्षकांचे मेहनतीचे कौतुक केले यावेळी उपस्थित सर्वांनी टाळ्यांच्या गजरात हस्सान अन्सारीचे अभिनंदन केले.हस्सानच्या यशामुळे जामीया इस्लामिया बहरुल उलुम पाटोदा संस्थेचे नाव उंचावले आहे. यावेळी मुफ्ती जफर साहेब मौलाना मोईज . मौलाना मजहर . मौलाना आरबाज .मौलाना जहुर . मराठी विषयाचे शिक्षण देणारे अमजद खान पठाण सर व इंग्रजी गणित विषयाचे शिक्षण देणारे प्रा . सचिन गायकवाड सर अयुब मोमिन अमजद खान पठाण हजर होते.

# सर्व धरणांवर फ्लोटिंग सोलर बसवले जाणार

## राज्य सरकार घेणार मोठा निर्णय, शेतकऱ्यांना होणार फायदा

पाण्याचे बाष्पीभवन रोखण्याच्या संदर्भात लवकरच राज्य सरकार मोठा निर्णय घेणार आहे. यासाठी राज्यात फ्लोटिंग सोलर योजना राबवली जाणार आहे. सर्व धरणांवर फ्लोटिंग सोलर बसवले जाणार असल्याची माहिती विश्वसनीय सूत्रांनी दिली आहे.

दरम्यान, फ्लोटिंग सोलरमधून मोठ्या प्रमाणात वीज निर्मिती देखील होणार आहे. याबाबत लवकरच निविदा जाहीर होणार असल्याची माहिती विश्वसनीय सूत्रांची दिली आहे. दरम्यान, राज्यातील प्रमुख धरणांवर फ्लोटिंग सोलरच्या माध्यमातून वीज निर्मिती केल्यामुळं याचा मोठा फायदा शेतकऱ्यांना होणार. त्यामुळं शेतकऱ्यांना एक प्रकारचा या निर्णयातून दिलासा मिळणार आहे. या माध्यमातून स्वस्त दरात वीज उपलब्ध करुन देण्यास मदत मिळणार आहे. दरम्यान, शेतकऱ्यांच्या दृष्टीनं हा निर्णय अत्यंत महत्वाचा मानला जात आहे. कमी दरात वीज उपलब्झ धाल्यास शेतकऱ्यांनी शेतीत मोठा फायदा होणार



असल्याचं बोललं जात आहे.

जायकवाडीवर १२०० मेगावॅटचा फ्लोटिंग प्लांट : गेल्या ८ दिवसापूर्वीच मुख्यमंत्र्यांचे मुख्य आर्थिक सल्लागार प्रवीण परदेशी यांनी महाराष्ट्राच्या विकासाचा रोडमॅप मांडला होता. यावेळी त्यांनी महाराष्ट्राची आर्थिक स्थिती, वाटचाल, ध्येयधोरणे आणि भारताला जागतिक अर्थव्यवस्थेत अग्रस्थानी नेण्याच्या दृष्टीने महाराष्ट्राचा वाटा अशा विविध अंगांवर भाष्य केलं होतं. थोरीयमवर न्युक्लिअर एनर्जी असावी यासाठी प्रयत्न करतोय, हे नवीन तंत्रज्ञान आहे. जायकवाडीवर १२०० मेगावॅटचा फ्लोटिंग प्लांट आम्ही करत असल्याची माहिती परदेशी यांनी दिली होती. नवीन तंत्रज्ञान अवगत करणे आणि फायदा घेणे हा एक उद्देश. लाँगटर्म अर्थात दीर्घ मुदतीचे कर्ज घेण्याचे आपले प्रयत्न आहेत. कर्ज छोटे घेतले तर प्रकल्प पूर्ण होण्याआधीच आपल्याला कर्ज फेडावे लागतात आणि अनेकदा डेब्ट निर्माण होते. ह्या बँकांचे व्याजदर खूप कमी असतात. सोबतच पैसे नॉन कॅपिटलवर वळते करता येत नाही, असं परदेशी म्हणाले होते. विकासासाठी अतिरिक्त पैसा उभा करण्याचा प्रयत्न आम्ही करु. शासनात दररोजचे प्रश्न सोडवायला लागतात, अशात पुढील १० वर्षात नेमकं काय होणार यासाठी विचार करायला वेळ नसतो. त्यामुळे तंत्रज्ञानाच्या आधारे विकास व्हावा आणि पुढील विचार करावा हे प्रयत्न आमचे असतील, असं प्रवीण परदेशी यांनी सांगितलं होतं.

# बरसीम लागवड करा मिळवा आर्थिक फायदे



सध्याच्या घडीला डेअरी व्यवसाय ग्रामीण भागात शेतकऱ्यांसाठी मोठा व्यवसाय म्हणून समोर आला आहे. पशुपालन करणारे शेतकरी बहुतांशी जातिवंत दुधाळ गायी आणि म्हशी पाळण्यास प्राधान्य देतात. डेअरी व्यवसायातून शेतकऱ्यांना बऱ्यापैकी आर्थिक फायदा देखील होत आहे. मात्र, बऱ्याचदा जनावरांच्या खानपानावर विशेष लक्ष न दिल्यामुळे शेतकऱ्यांना आर्थिक नुकसान सोसावे लागते. त्यामुळे डेअरी व्यवसाय सुरू करण्याआधी जनावरांची देखभाल आणि आहाराबाबत शेतकऱ्यांना अधिक माहिती असणे आवश्यक असते. दुधाळ जनावरांना बरसीम गवत हे अतिशय लाभदायक आहे.

बरसीम हे गवत शेतकरी आणि पशुपालकांसाठी खूप महत्वाचे आहे. जनावरांच्या आहारात त्याचा समावेश केल्यास, दूध उत्पादनात वाढ होण्यास मदत होते. बरसीम गवत हे मेथीच्या भाजीप्रमाणे असलेले एक चारा पीक आहे. बरसीम नैसर्गिकरित्या उगवत नाही. परंतु जनावरांच्या चाऱ्यासाठी त्याची मोठ्या प्रमाणावर लागवड केली जाते. कडधान्य पीक म्हणूनही त्याची ओळख आहे. रब्बी हंगामात पाण्याची पुरेशी सोय असलेल्या भागात बरसीमची लागवड केली जाते. सुमारे दीड ते दोन महिन्यांनंतर बरसीमचे गवत कापणीला येते. हे गवत वेगाने वाढणारे गवत असून, ते ३५ दिवसांच्या अंतराने पाच ते सहा वेळा कापले जाऊ शकते. विशेष म्हणजे बरसीम पेरल्याने शेताची सुपीकताही वाढते.कसे देतात जनावरांना बरसीम गवत :

उन्हाळाच्या दिवसांमध्ये दुधाळ जनावरांची दूध उत्पादन क्षमता कमी होते. अशा परिस्थितीत जनावरांचे दूध उत्पादन वाढविण्यासाठी पुरेसा हिरवा चारा व धान्याच्या कणेची व्यवस्था करणे आवश्यक असते. बरसीम गवत जनावरांचे दूध वाढवण्यासाठी उपयुक्त आहे. ते कापून पेंढा मिसळल्याने फायदा होतो. प्रत्येक तीन किलो पेंढ्यामध्ये दीड किलो बरसीम गवत मिसळून दुधाळ जनावरांना खायला देणे चांगले असते. पौष्टिक गुणधर्मांनी समृद्ध असण्यासोबतच ते पचायलाही सोपे असते. दुधाळ जनावरांना दररोज बरसीम खायला दिल्याने त्यांचे दूध वाढते आणि त्यांचे आरोग्यही चांगले राहते.

आर्थिक स्थिती सुधारण्यास होते मदत : जर तुमच्याकडे पाण्याची सोय असेल तर लहान जागेतही तुम्ही बरसीम गवत लागवड करू शकतात. हे गवत वेगाने वाढण्यासोबतच जमिनीची सुपीकता वाढवण्यासाठी मदत करते. ग्रामीण भागात अनेक शेतकरी मोठ्या प्रमाणावर बरसीमची लागवड करतात. याशिवाय शहरांमध्येही राहणाऱ्या दुग्ध उत्पादकांना या गवताची विक्री केली जाते. बरसीम गवतामुळे जनावरांचे दूध उत्पादन वाढवण्याबरोबरच शेतकऱ्यांची आर्थिक स्थितीही सुधारण्यास मदत करतो.

# खरीप हंगामातील चारा व गवत पिकांचे लागवड तंत्रज्ञान

पश्चिम महाराष्ट्रात पशुपालन व दुग्ध व्यवसाय हा शेतीला पूरक जोडधंदा तसेच अधिक उत्पन्न व आर्थिक स्थैर्य देणारा व्यवसाय म्हणून ओळखला जातो. दुग्ध व्यवसायात मिळणारे उत्पादन हे पशुच्या अनुवांशिकतेवर आणि त्याला मिळणाऱ्या संतुलित आहारावर अवलंबुन असते. शेतकऱ्यांमध्ये चारा पिकांच्या सुधारित वाणांच्या लागवडीबाबत असलेल्या अज्ञानामुळे बहुतेक ठिकाणी हिरव्या चाऱ्याची कमतरता ३५ ते ४० टक्के पर्यंत दिसून येते.



पशु आहारात दर्जेदार हिरव्या चाऱ्याचे महत्त्व : १.जनावरांची निरोगी वाढ व प्रजनन क्षमता टिकवण्यासाठी हिरवा चारा आवश्यक आहे. २.हिरवा चारा चवदार व पाचक असल्याने आहारातील महत्वाचे घटक नैसर्गिक स्वरूपात उपलब्ध झाल्याने जनावराचे शरीराच्या कोणत्याही अवयावर ताण न येता पचन होते व तापमान नियंत्रित राहण्यास मदत होते. ३.जनावरांच्या आहारात हिरव्या चाऱ्याची कमतरता असल्यास उत्तम खुराक देवुन सुध्दा जनावरांचे उत्पादनक्षम वय व उत्पादन यावर विपरीत परिणाम होवू शकतो. ४.दर्जेदार हिरव्या चारा अभावी गाभण गायींना कमजोर व रोगट वासरे निपजतात. ५.आहारात जास्त प्रमाणात खुराक व कमी प्रमाणात हिरवा चारा असे प्रमाणे जास्त काळ राहिल्यास जनावरांच्या पचन संस्थेवर विपरीत परिणाम होतो.

मका : मका हे जलद वाढणारे, पालेदार, सकस, रुचकर, अधिक उत्पादनक्षम, पौष्टिक तसेच भरपूर शर्करायुक्त पदार्थ असणारे चारा पीक आहे. मक्याच्या चाऱ्यापासून उत्तम दर्जाचा मुरघासही तयार करता येतो. हिरव्या चाऱ्यात ९ ते ११ टक्के प्रथिनांचे प्रमाण असते. जून-जुलै महिन्यात पाभरीने ३० सेंमी अंतरावर पेरणी करावी. प्रति हेक्टरी १०० किलो नत्र, ५० किलो स्फुरद व ५० किलो पालाश द्यावे. यापैकी ५० किलो नत्र, ५० किलो स्फुरद व ५० किलो पालाश पेरणीच्यावेळी व उर्वरीत ५० किलो नत्राचा दुसरा हप्ता पेरणीनंतर एक महिन्याने द्यावा.

ज्वारी : हे महाराष्ट्रातील सर्वात लोकप्रिय असे महत्त्वाचे पारंपारिक चारा पिक आहे. अवर्षणप्रवण भागात व हलक्या जमिनीत देखील तग धरून राहण्याची क्षमता असल्याने निश्चित चारा उत्पादन देणारे पिक म्हणून या पिकाकडे पाहिले जाते. ज्वारीचा कडबा देखील जनावरांना चारा म्हणून देता येतो.

ज्वारीचे चाऱ्याकरिता विकसित केलेले वाण सुमारे ३ ते ४ मीटर उंच वाढतात. त्याची ताटे हिरवीगार, पालेदार, रसाळ, रुचकर व पौष्टिक असल्यामुळे जनावरे ती आवडीने खातात. ज्वारीच्या चाऱ्यात ८ ते १० टक्के प्रथिने असतात. या चारा पिकासाठी मध्यम ते भारी व चांगली निचरा होणारी जमीन लागते. पूर्वमशागतीच्या वेळी हेक्टरी ५ टन भरखत म्हणून शेणखत अथवा कंपोस्ट खत जमिनीत मिसळावे.

बाजरी : बाजरी हे हलक्या ते मध्यम जमिनीत घेतले जाणारे तृणधान्य वर्गातील चारा पिक असून महात्मा फुले कृषि विद्यापीठाने जायंट बाजरा या वाणाची चाऱ्यासाठी शिफारस केलेली आहे. या वाणाचा वाढीचा कल उंच असून लुसलुशीत हिरव्या चाऱ्यात प्रथिनांचे प्रमाणे ७ ते ९ टक्के असते.

बागायती मारवेल : बागायत भागात हिरव्या चाऱ्यासाठी भरपुर फुटवे गोड, (ब्रिक्स ७.५०), रुचकर, जास्त पचनियता (६१.३० टक्के) असलेला 'फुले गोवर्धन' हा मारवे गवताचा बहुवार्षिक वाण मध्यम ते भारी, कसदार व उत्तम निचऱ्याच्या जमिनीसाठी विद्यापीठाने लागवडीसाठी शिफारस केला आहे. ४५३० सेंमी अंतरावर प्रत्येक ठिकाणी दोन डोळ्यांची एक कांडी याप्रमाणे हेक्टरी ७५ हजार कांड्यांची लागवड पावसाळ्यात जून ते ऑगस्ट या कालावधीमध्ये करावी.

स्टायलो : हे व्दिदल बहुवार्षिक चारा पिक असुन जिरायत भागात हलक्या ते मध्यम जमिनीत ''फुले क्रांती'' या वाणाची पेरणी जून ते जुलै महिन्यात करावी. हे पीक आवर्षणप्रर्वण भागात मुरमाड व अतिशय हलक्या तसेच डोंगर उतारावरील जमीनीतही तग धरुन राहते. फळबागामध्ये अंतरपिक म्हणुन सुध्दा फायदेशीर ठरते तसेच जमिनीची धुप होवू नये म्हणुन शेततळ्याच्या भरावावर लागवड करता येते. या गवतात प्रथिनांचे प्रमाणे १२ ते १४ टक्के आढळते.

# भरघोस उत्पादनासाठी जाणून घ्या कापसाचे प्रमुख वाण

खरीप हंगामाला येत्या काही दिवसात सुरुवात होणार आहे. खरिपात यंदाही कापसाची मोठ्या प्रमाणात लागवड होण्याची शक्यता आहे. खरे तर गेल्या वर्षी कमी पाऊस झाला होता तरी देखील कापसाची लागवड मोठ्या प्रमाणात पाहायला मिळाली.

यंदा मात्र हवामान खात्याने चांगल्या पावसाची शक्यता वर्तवली असून, यामुळे यावर्षी कापूस लागवड वाढणार असल्याचे जाणकारांकडून सांगितले जात आहे. याच पार्श्वभूमीवर कापसाच्या काही प्रमुख जातींची माहिती जाणून घेण्याची गरज आहे.

'हे' आहेत कापसाचे प्रमुख वाण - नुझिवेदू सीड्स कंपनीचे आशा बी टी २ :

गेल्या वर्षी कापसाच्या या जातीपासून शेतकऱ्यांनी चांगले उत्पादन मिळवले आहे. दुष्काळी परिस्थिती असताना देखील शेतकऱ्यांनी १८ क्विंटलपर्यंतचे उत्पादन मिळवले आहे.

अशा परिस्थितीत जर मान्सून सामान्य राहिला तर या जातीपासून २१ ते २२ क्विंटलपर्यंतचे उत्पादन मिळू शकते, असा दावा कंपनीकडून केला जात आहे.या जातीचे कापूस बोंड टपोर असते आणि कापसाला वजन चांगले मिळते.

२७ ते २९ एमएम धागा असतो. म्हणजेच ही एक मिडीयम स्टेपल कापसाची जात आहे. बागायती भागासाठी हा वाण योग्य असल्याचे



आढळून आले आहे.

मोक्ष १५ ३९ २ : कापसाच्या या जातीपासून देखील गेल्यावर्षी शेतकऱ्यांनी विक्रमी उत्पादन मिळवले आहे. या जातीपासून ड्रीप इरिगेशन करून गेल्यावर्षी शेतकऱ्यांनी १९ ते २० क्विंटलपर्यंतचे उत्पादन मिळवले आहे. मे महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात पेरणी केली तरी यातून चांगले उत्पादन मिळते. या जातीच्या कापसाचा धागा हा २५ ते २९ एमएम एवढा म्हणजेच मध्यमच स्टेपल आहे. या जातीवर रसशोषक किडीचा आणि रोगांचा फारसा प्रादुर्भाव पाहायला मिळत नाही.

तुळसी कंपनीचे कबड्डी : जे शेतकरी कापसाची लागवड करतात. त्यांना या जातीची माहिती असेल. हा वाण संपूर्ण महाराष्ट्रभर प्रसिद्ध आहे. कापूस उत्पादक शेतकऱ्यांमध्ये लोकप्रिय या जातीची राज्यातील अनेक भागांमध्ये लागवड केली जाते. मराठवाडा आणि विदर्भ येथील प्रमुख कापूस उत्पादक जिल्ह्यांमध्ये या जातीच्या कापसाची लागवड पाहायला मिळते. या जातीबाबत बोलायचे झाले तर कीड, रोगास कमी बळी पडते. जास्त पाऊस पडला म्हणजे अतिवृष्टीसारखी परिस्थिती तयार झाली तरी चांगले उत्पादन मिळते. आणि कमी पाऊस पडला तरी देखील यातून चांगले उत्पादन मिळते.

युएस ॲग्री सीड्स कंपनीचे युएस ७०६७ : या जातीपासून देखील १२ ते १७ क्विंटल पर्यंतचे उत्पादन मिळते. शेतकऱ्यांमध्ये ही जात बऱ्यापैकी लोकप्रिय असून बागायती आणि जिरायती अशा दोन्ही परिस्थितींमध्ये या जातीचे उत्पादन घेतले जाऊ शकते.

ॲग्रो स्टार कंपनीचे शिवांश : या जातीची देखील राज्यातील काही शेतकरी लागवड करतात. मात्र, या जातीची बागायती भागात लागवड केल्यास चांगले उत्पादन मिळते. कोरडवाहू भागात याची लागवड करू नये, असा सल्ला देण्यात आला आहे. या जातीपासून १८ ते १९ क्विंटलपर्यंतचे उत्पादन मिळते.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१६३९ : मुघल सम्राट शाहजहान यांनी दिल्ली येथील लाल किल्ल्याचे निर्माण करण्यास पाया रचला.
१८१३ : अमेरिकन वैज्ञानिक जेएफ हम्मेल यांनी रबराचे नमुने सादर केले.
१९३० : ब्रिटन आणि ऑस्ट्रेलिया देशांतर्गत दूरध्वनी (टेलीफोन) सेवा सुरु करण्यात आली.
१९३३ : 'प्रभात'चा 'सिंहगड' हा चित्रपट प्रदर्शित झाला.
१९३९ : साली स्वातंत्र्य सेनानी नेताजी सुभाष चंद्र बोस यांनी राष्ट्रीय काँग्रेस पक्षामधून आपल्या पदाचा राजीनामा दिला होता.
१९४५ : दुसरे महायुद्ध इटलीतील जर्मन सैन्याने दोस्त राष्ट्रांपुढे बिनशर्त शरणागती पत्करली.
१९८६ : लॉस एंजेल्स सेंट्रल लायब्ररीतील आग लागल्यामुळे सुमारे ४,००,००० पुस्तक नष्ट झाले.
१९९१ : बांगलादेशच्या दक्षिण भागातील चितगाव जिल्ह्यात आलेल्या एका भीषण चक्रीवादळाने सुमारे १,३८,००० लोकांचा बळी घेतला तर सुमारे १ कोटि लोक बेघर झाले.
२००७ : ऑस्ट्रेलियन क्रिकेट संघाने श्रीलंकन क्रिकेट संघाचा पराभव करून तिसऱ्यांदा विश्वकप जिंकला.
२०११ : ब्रिटीश राजकुमार प्रिंस विलियम आणि केट मिडलटन यांचा विवाह पार पडला.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१५४२ : मेवाड प्रांताचे शासक महाराणा प्रताप यांचे मित्र, सहकारी आणि विश्वासपात्र सल्लागार भामाशाह यांचा जन्मदिन.
१७२७ : फ्रेंच नर्तक आणि बॅलेट चे निर्माते जीन-जॉर्जेस नोव्हर यांचा जन्म. (मृत्यू: १९ ऑक्टोबर १८१०)
१८४८ : राजा रविवर्मा चित्रकार (मृत्यू: २ आक्टोबर १९०६)
१८६७ : डॉ. शंकर आबाजी भिसे भारताचे 'एडिसन' (मृत्यू: ७ एप्रिल १९३५)
१८९१ : भारतीय कवी आणि कार्यकर्ते भारतीदासन यांचा जन्म. (मृत्यू: २१ एप्रिल १९६४)
१९०१ : मिचेनोमिया हिरोहितो दुसर्या महायुद्धाच्या आधी व नंतरच्या काळातील जपानी सम्राट (मृत्यू: ७ जानेवारी १९८९)
१९१९ : साली हिंदुस्थानी शास्त्रीय संगीतात विशेष कौशल्य मिळविणारे प्रख्यात भारतीय तबला वादक अल्ला रखा उर्फ अल्लारख्खा कुरेशी यांचा जन्मदिन.
१९५८ : पद्मभूषण व साहित्य अकादमी पुरस्कार सन्मानित भारतीय इतिहासकार आणि अर्थशास्त्रज्ञ तसचं, द टेलीग्राफ, हिंदुस्तान टाईम्स आणि हिंदी दैनिक वृत्तपत्र अमर उजाला यांचे स्तंभलेखक रामचंद्र गुहा यांचा जन्मदिन.
१९३६ : झुबिन मेहता भारतीय संगीतकार
१९६६ : फिल टफनेल इंग्लिश फिरकी गोलंदाज
१९७० : आंद्रे आगासी अमेरिकन लॉनटेनिस खेळाडू
१९७९ : प्रसिद्ध भारतीय सेवानिवृत्त क्रिकेटपटू व जलदगती गोलंदाज आशिष नेहरा यांचा जन्मदिन.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१२३६ : दिल्ली येथील सल्तनत साम्राज्याचे प्रभावी संस्थापक व दिल्लीच्या गादीवर राज्य करणारे पहिले मुस्लीम शासक शम्सउद्दीन इल्तुतमिश यांचे निधन.
१९४५ : हाइनरिक हिमलर जर्मन नाझी अधिकारी (जन्म: ७ आक्टोबर १९००)
१९५८ : भारताच्या उडीसा राज्यातील प्रख्यात स्वातंत्र्यसेनानी, क्रांतिकारक व गांधीवादी कार्यकर्ता गोपबंधू चौधरी यांचे निधन.
१९६० : पं. बाळकृष्ण शर्मा ऊर्फ 'नवीन' हिन्दी कवी. हिन्दीला राष्ट्रभाषा म्हणून मान्यता मिळवण्यासाठी त्यांनी खूप प्रयत्न केले. (जन्म: ८ डिसेंबर १८९७)
१९७९ : भारतीय स्वातंत्र्य सेनानी, पत्रकार, लेखक, क्रांतिकारक व समाजसुधारक राजा महेंद्र प्रताप यांचे निधन.
१९८० : श्रीकृष्ण के. क्षीरसागर लेखक, विचारवंत, समीक्षक (जन्म: ६ नोव्हेंबर १९०१)
१९८० : सर अल्फ्रेड हिचकॉक चित्रपट दिग्दर्शक (जन्म: १३ ऑगस्ट १८९९)
१९९७ : रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाचे सतरावे गव्हर्नर व भारतीय प्रशासकीय सेवेचे सदस्य आर.एन.मल्होत्रा यांचे निधन.
१९९९ : भारतीय चित्रपट दिग्दर्शक, निर्माता, पटकथा लेखक आणि हिंदी चित्रपटांचे गीतकार केदार शर्मा यांचे निधन.
२००६ : जे. के. गालब्रेथ कॅनेडियन-अमेरिकन अर्थशास्त्रज्ञ (जन्म: १५ आक्टोबर १९०८)
२०१० : गायत्री मंडळाच्या संस्थापिका व सदस्या तसचं, समाजसेविका कमलादेवी शुक्ला यांचे निधन.

# उन्हाळ्यात फळझाडांची काळजी

सद्या उन्हाळ्याचे दिवस आहेत. या दिवसांत झाडांना पाण्याची गरज असताना पाणी मिळत नाही. यामुळे शेतकरी वेगवेगळ्याप्रकारे पाणी देण्याचा आणि झाडांभोवती ओल टिकवून ठेवण्याचा प्रयत्न करतात.

फळझाडामध्ये आच्छादनाचा वापर : आच्छादनाचा उपयोग केल्यास पावसाचा जमिनीवर पडण्याचा वेग मंदावतो आणि जमिनीत जास्तीत जास्त पाणी मुरले जाते. आच्छादनाच्या वापरामुळे जमिनीची धूप कमी होते. आच्छादनामुळे जमिनीतील पाण्याचा बाष्पीभवनाचा वेग मंदावतो आणि जमिनीत जास्त काळ टिकतो. तणांच्या वाढीस काही प्रमाणात आळा बसतो. जमिनीत योग्य तापमान राखण्यास मदत होते. जमिनीला भेगा पडण्याचे प्रमाण कमी होते अथवा जमिनीस भेगा पडण्याचा कालावधी लांबतो. आच्छादनाच्या वापराने दिलेल्या खतांचा जास्त कार्यक्षमतेने उपयोग करून घेता येतो. उन्हाळी हंगामात दोन पाण्याच्या पाळ्यातील कालवधी वाढविता येतो. जमिनीत सेंद्रिय पदार्थांचे प्रमाण वाढून जमिनीचा पोत सुधारण्यास मदत होते. आच्छादनामुळे पिकांची वाढ चांगली होऊन उत्पादनातही वाढ होते. खतांची फवारणी करणे : उन्हाळी हंगामात बाष्पीभवन व पर्णोत्सर्जनाचा वेग जास्त असल्यामुळे फळझाडांची पाने कोमजतात. पानांचे तापमान वाढते व पानातील पाण्याचे प्रमाण कमी होऊन पानातील अन्नांश तयार होण्याची क्रिया मंदावते. अशा वेळी १ ते १.५ टक्के (१०० ते १५० ग्रॅम १० लिटर पाणी) पोटॅशियम नायट्रेट (३) आणि २ टक्के विद्राव्य डायअमोनियम फॉसपेट (२०० ग्रॅम १० लिटर पाणी) यांची २५-३० दिवसाच्या अंतराने फवारणी करावी. यामुळे पानातील अन्नांश तयार होण्याची क्रिया गतिमान होते व झाडे जमिनीतील ओलावा शोषण्यास सुरुवात करतात. फळझाडांना बोर्डोपेस्ट लावणे : उन्हामुळे झाडातील पाण्याचे प्रमाण कमी झाल्यास झाडांच्या खोडावरील साली तडकण्याचे प्रमाण वाढू शकते.

cmyk



# लिंबागणेशाच्या जडणघडणीचा मुक साक्षीदार असणाऱ्या वटवृक्षाला भिषण आग

## २ तासानंतर अग्निशामक दलाला आग विझविण्यात यश



लिंबागणेश। प्रतिनिधी

बीड तालुक्यातील श्रीक्षेत्र भालचंद्र गणपती देवस्थानामुळे प्रसिद्ध असलेल्या अडीचशे वर्षांपूर्वीचा ४-५ पिढ्यांचा लिंबागणेशच्या जडणघडणीचा मुक साक्षीदार असणा-या वटवृक्षाला आज दि.२९ मंगळवार रोजी सकाळी आग लागली. डॉ.गणेश ढवळे, विक्रांत वाणी यांनी बीड नगरपरीषदेच्या अग्निशामक दलाशी संपर्क साधुन दुर्दैवी घटनेची कल्पना दिली.अर्ध्यातासात बीड नगर परीषदेचे अग्निशामक दलाचे रमेश आदमाने,अक्षय नखाते आणि वाहन चालक अनिकेत कपाळे यांनी घटनास्थळी धाव घेऊन आग विझवण्याचा प्रयत्न केला. २ तासांच्या अथक प्रयत्नानंतर आग विझविण्यात यश आले.दरम्यान पाणी संपल्याने लिंबागणेश येथील गावाला टँकर द्वारे पिण्याचे पाणी पुरवठा करणाऱ्या दादाराव येडे यांनी विनामूल्य आग विझवण्यासाठी पाणी उपलब्ध करून दिले. बीड वनपरीक्षेत्र अधिकारी अशोक काकडे यांना कळल्यानंतर वनविभागाचे दोन कर्मचाऱ्यांनी घटनास्थळी येऊन पंचनामा केला.

बीड तालुक्यातील लिंबागणेश येथील बसस्थानक परिसरातील जवळपास अडीचशे वर्षांपूर्वीच्या वटवृक्षाला आज सकाळी ९ च्या सुमारास आग लागल्याचे निदर्शनास आले. ग्रामस्थांनी याठिकाणी गर्दी केली होती. आगीने रौद्ररूप धारण केल्याने आग विझवण्यासाठी अग्निशामक दलाला पाचारण केले.आगीत वटवृक्षाचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे.

सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे व विक्रांत वाणी यांनी बीड अग्निशामक दलाला तसेच वनपरीक्षेत्र अधिकारी काकडे यांना फोटो आणि व्हिडिओ पाठवुन वडाला लागलेल्या आगीची कल्पना दिली. या झाडांवर वास्तव्यास असलेल्या पक्षांची घरटी आगीत जळून खाक झाली. उन्हाची तिव्रता वरचेवर वाढत चालली आहे. ग्रामीण भागात ग्रामस्थांनी कचरा व शेतकऱ्यांनी खोडवा पेटवण्याच्या घटनांमुळे वृक्ष आगीत होरपळून जात आहेत. ग्रामस्थांनी वारंवार आवाहन करूनही वृक्षांचे गांभीर्य लक्षात येत नसल्याचे आजच्या घटनेवरून दिसून येत आहे. पुढच्या पिढीच्या भवितव्यासाठी प्रत्येक माणसाने वृक्ष लागवड,वृक्ष संगोपन आणि आगीपासून संरक्षण करण्याची आवश्यकता असल्याचे वृक्षप्रेमी डॉ.गणेश ढवळे यांनी आवाहन केले आहे.




# युसूफवडगांव येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती उत्साहात

युसूफवडगांव। प्रतिनिधी

केज तालुक्यातील युसूफवडगांव येथे दि.२८ एप्रिल रोजी विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची १३४ वी जयंती अतिशय उत्साहात व धुमधडाक्यात साजरी करण्यात आली.

सालाबादप्रमाणे याही वर्षी युसूफवडगांव येथे विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांची जयंती अतिशय आनंदमय व उत्सर्फुत वातावरणात साजरी करण्यात आली जयंती मिरवणुकीत अतिशय भव्यदिव्य असा मिरवणूक देखावा सादर करण्यात आला होता.यावेळी विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळयासह महात्मा बसवेश्वर महाराज,छत्रपती शिवाजी महाराज,छत्रपती संभाजी महाराज,महात्मा ज्योतिबा फुले,छत्रपती शाहू महाराज व साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांचे देखील पुतळे उभे करून आम्ही सर्व एक असुन या सर्व महापुरुषांच्या विचाराने एकत्र बांधले गेले आहोत असे या देखाव्याद्वरे दाखवण्याचा प्रयत्न जयंती उत्सव समितीच्या वतीने करण्यात आला.त्तपुर्वी उपसरपंच महेश लामतुरे,जेष्ठ शिक्षक राजाभाऊ खरबड,डॉ.महादेव कोरसळे,सचिन जावळे,विकास जाधव,मन्मथ पाटील, बापुसाहेब भुसारी,भैय्यासाहेब सावंत,ज्योतिराम शिंदे,दत्ता निकम,दत्ता बाबर,उत्रेश्वर खरबड यांच्या हस्ते महापुरुषांच्या पुतळ्यांना पुष्पहार अर्पण करून जयंतीची सुरुवात करण्यात आली.

# ग्रामीणमध्ये हॉटेल व लॉजला आता मिळणार लीफ रेटिंग –जिल्हाधिकारी डॉ .पांचाळ

जालना। प्रतिनिधी

स्वच्छ भारत मिशन कार्यक्रम अंतर्गत ग्रामीण भागातील हॉटेल, लॉजिंग,धर्मशाळा , न्याहारी निवास या ठिकाणांना आता स्वच्छता ग्रीन लीफ रेटिंग या अंतर्गत १ ते ५ लीफ रेटिंग दिले जाणार असून त्यामुळे ग्रामीण भागातील स्वच्छतेला अधिक गती मिळेल असे प्रतिपादन जिल्हाधिकारी श्रीकृष्ण पांचाळ यांनी पत्रकाद्वारे कळविण्यात येत आहे. केंद्र शासनाच्या वतीने स्वच्छ भारत मिशन कार्यक्रम अंतर्गत स्वच्छता ग्रीन लीफ रेटिंग कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून या साठी जिल्हास्तरीय समिती गठीत करण्यात आली आहे. जिल्हाधिकारी श्रीकृष्ण पांचाळ हे समितीचे अध्यक्ष असून,जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जगदीश मिनियार उपाध्यक्ष आहेत. तर प्रकल्प संचालक ,स्वच्छ भारत मिशन बालाजी बारगीरे सदस्य सचिव, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पं) उदयसिंग राजपूत सदस्य व उद्योग मधील हस्तीमल बंब हे सदस्य असणार आहेत. सदरील समिती जिल्हा व तालुकास्तरावर काम पाहणार आहे. तालुकास्तरावरील समिती मध्ये उप विभागीय दंडाधिकारी ()यांच्या अध्यक्षतेखाली ,गट विकास अधिकारी ,तालुका आरोग्य अधिकारी, विस्तार अधिकारी (पं),शिक्षण विभाग,पर्यटन किंवा उद्योग क्षेत्रातील पाणी पुरवठा विभाग (तांत्रिक बाबी पाहणारे )अधिकारी /कर्मचारी यांचा समावेश असणार आहे.



सदरील उपक्रमात जिल्ह्यातील हॉटेल, लॉजिंग, धर्मशाळा,आदि ठिकाणचे स्वच्छता ग्रीन लीफ रेटिंग अंतर्गत गुणांकन करून त्यांना १ ते ५ लीफ नामांकन देण्यात येणार आहे. यामुळे ग्रामीण भागातील पर्यटनास अधिकाधिक गती प्राप्त होईल. त्यामुळे सर्व हॉटेल व लॉजिंग व्यावसायिकाने यात मोठ्या प्रमाणात सहभागी व्हावे असे आवाहन ही त्यांनी केले आहे. पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्रालय व पर्यटन यांच्या वतीने ग्रामीण भागातील हॉटेल,लॉजिंग,धर्मशाळा या ठिकाणच्या घनकचरा व्यवस्थापन , मैलागाळ व्यवस्थापन,सांडपाणी व्यवस्थापन.या तीन निकषावर गुणांकन होणार आहे.यात घनकचरा व्यवस्थापन ८० गुण , मैलागाळ व्यवस्थापन ८०, तर सांडपाणी व्यवस्थापन ४० गुण असे एकूण २०० गुण निश्चित करण्यात आले असून व्यावसायिकास स्वंय मूल्यांकनात किमान १३० गुण असणे आवश्यक आहे. १०० ते १३० गुणांकन प्राप्त करणाऱ्या संस्थेस १ लीफ, १३० ते १८० गुणांकन प्राप्त करणाऱ्या संस्थेस ३ तर १८० ते २०० गुण प्राप्त करणाऱ्या संस्थेस ५ लीफ दिले जाणार आहेत.

१ लीफ गुनांकन प्राप्त करणेसाठी मैला गाळ व्यवस्थापन व घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत किमान ४० गुण व सांडपाणी व्यवस्थापनात २० गुण असणे अवश्यक आहे. तर ३ लीफ गुणांकन प्राप्त करणेसाठी मैलागाळ व्यवस्थापन व घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत किमान ५० गुण व सांडपाणी व्यवस्थापनात २० गुण असणे अवश्यक आणि ५ लीफ गुणांकन प्राप्त करणेसाठी मैलागाळ व्यवस्थापन व घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत किमान ६० गुण व सांडपाणी व्यवस्थापनात ३० गुण असणे अवश्यक आहे. लवकरच या बाबीची सविस्तर अहवाल सादर करण्यासाठी जिल्हाधिकारी डॉ.श्रीकृष्ण पांचाळ व मुख्य कार्यकारी अधिकारी जगदीश मिनियार यांच्या मार्गदर्शनाखाली व्यापक बैठकीचे आयोजन करण्यात येणार असल्याचे प्रकल्प संचालक तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी लिंबाजी बारगिरे व जनसंपर्क अधिकारी व संवाद तज्ञ भगवान तायड हे नियोजन करत आहेत.

# पहलगाम दहशतवादी हल्ल्यातील मृतांना सर्वपक्षीय श्रद्धांजली

## देशातील सामाजिक सलोखा अबाधित राखण्याचे आवाहन

माजलगाव । प्रतिनिधी

देशातील जम्मू आणि काश्मीर मधील पहलगाम अतिशय सुंदर पर्यटन स्थळ असून, काही दिवसांपूर्वी येथील पर्यटकांवर दहशतवादी हल्ला झाला. यावेळी या हल्ल्यात तब्बल २८ भारतीय पर्यटकांचा मृत्यू झाला.सदरील दहशतवादी हल्ल्यात मृत्यू झालेल्या भारतीयांना श्रद्धांजली अर्पण पर कार्यक्रम काँग्रेसचे जेष्ठ नेते हरिभाऊ सोळंके यांच्या पुढाकारातून शहरातील ठक्कर बाजार येथे सर्वपक्षीय श्रद्धांजली कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.



यावेळी सदरील कार्यक्रमात चळवळीतील बहुजन विकास मोर्चाचे संस्थापक अध्यक्ष बाबुराव पोटभरे, कम्युनिस्ट पक्षाचे जेष्ठ नेते कॉ.मुसद्दीक बाबा, जेष्ठ नेते दयानंद स्वामी,आझाद क्रांती सेना प्रमुख राजेश घोडे, राष्ट्रवादी काँग्रेसचे शरद यादव,राष्ट्रीय काँग्रेसचे नारायण होके,राष्ट्रीय काँग्रेसचे दत्ता कांबळे,मनोहर डाके,ऍड.याकूब मेमन,अभय होके, धम्मानंद साळवे,श्रीहरी मोरे, रशीद शेख, अफरोज तांबोळी सह सर्वपक्षीय कार्यकर्ते उपस्थित होते.

यावेळी उपस्थित सर्वपक्षीय नेत्यांच्या भाषणातून सदरील हल्ल्याचा सामना करण्यासाठी प्रथम आणि शेवटी भारतीय म्हणून आपण देशातील सरकार सोबत ठाम पणे उभा असून, भारत सरकारने जशाच तसे उत्तर द्यावे तसेच देशातील सामाजिक सलोखा अबाधित ठेवण्यासाठी भारत सरकार सह देशातील प्रत्येक नागरिकांनी सहकार्य करावे असे एकमुखी आवाहन यावेळी उपस्तित सर्वपक्षीय नेत्यांनी यावेळी केले आहे.

# पशुसंवर्धन विभाग बीडच्या वतीने २ मे रोजी एक दिवसीय कार्यशाळा

बीड । प्रतिनिधी

राष्ट्रीय पशुधन अभियान अंतर्गत एक दिवसीय कार्यशाळा दिनांक ०२ मे २०२५ रोजी स्व. गोपीनाथराव मुंडे नटराज रंग मंदिर परळी वै. येथे सकाळी ०९.०० ते सायं. ५.०० वाजेपर्यंत पंकजा गोपीनाथराव मुंडे, मंत्री पशुसंवर्धन पर्यावरण व वातावरणीय बदल यांच्या उपस्थितीमध्ये करण्याचे नियोजन आहे.



या कार्यक्रमास बीड जिल्हयातील बँकेचे प्रतिनिधी, पशुपालक/शेतकरी यांच्यात थेट चर्चा आयोजित केलेली आहे. तरी बीड जिल्हयातील जास्तीत जास्त पशुपालक/शेतकरी यांनी सहभाग नोंदवावा असे आवाहन पशुसंवर्धन विभाग बीड यांच्या मार्फत करण्यात आलेले आहे. तसेच प्रस्तुत कार्यक्रमास जिल्हयातील काही निवडक बॅक अधिकारी व प्रगतीशिल पशुपालक यांना मा. मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात येणार आहे.

# लोकाभिमूख व गतिमान अभियान राबवावे -जिल्हाधिकारी

## १०० दिवसाच्या कार्यालयीन सुधारणा बैठक



बीड। प्रतिनिधी

१०० दिवसाच्या कार्यक्रमात जिल्हयातील प्रत्येक अधिका-यांनी नाविण्यपूर्ण,लोकाभिमूख, गतीमान अभियान राबवून स्वच्छता ठेवावी, असे आवाहन जिल्हाधिकारी विवेक जान्सन यांनी १०० दिवसांच्या कार्यालयीन सुधारणांची विशेष मोहिमेचा दुस-या टप्यातील कार्यालयाचा मुल्यामापन अहवाल आढावा व्ही.सी व्दारे घेण्यात आला. या प्रसंगी त्यांनी हे आवाहन केले.यावेळी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी,आदित्य जिवने, निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी, उपजिल्हाधिकारी (सामान्य प्रशासनाचे) शैलेस सुर्यवंशी तसेच विविध कार्यालयाचे कार्यालय प्रमुख व प्रतिनिधी उपस्थित होते.

याप्रसंगी जिल्हाधिकारी म्हणाले की, बीड जिल्हयामध्ये कार्यालयीन स्वच्छतेचा अभाव आढळून आला असून कार्यालयीन स्वच्छता हा पाया असून स्वच्छतेला प्रथम प्राधान्य द्यावे तसेच ही स्वच्छता केवळ अभियानापुरतीच मर्यादित न ठेवता कायम स्वरुपी ठेवावी. १०० दिवसांच्या कार्यालयीन सुधारणेत कार्यालयाचा कायापालट, शौचालय, पिण्याचे पाणी, कार्यालयीन स्वच्छता, कर्मचा-यांच्या टेबलवर नेम प्लेट, थम मशीन या सुधारणेला गतिमानता मिळावी. नागरिकांसोबत व्यवहार करतांना संवेदनशिलपणे करावा.कार्यालय प्रमुखास काही अडचणी असेल तर त्यांनी माझ्याशी संपर्क साधवा, प्रंलबित विषयी लवकरात लवकर सोडवावे यासंदर्भात अडचणी असेल तर टिपणी टाकावी किंवा ते काम का प्रलंबित आहे ते मुद्दे माझ्या निदर्शनास आणून द्यावेत.आपणास निधीची कमतरता असेल तर डिपीसीतून निधीची मागणी करावी, निधीची उपलब्धता करून दिली जाईल. १०० दिवसाची कार्यालयीन मोहिम दुस-या टप्यातील कामाची पीपीटी २ मे २०२५ पर्यंत कार्यालय प्रमुखाने सादर करावी अशी सूचना त्यांनी यावेळी केली. आपल्या काही नाविन्यपूर्ण कल्पना असतील तर त्याही मांडाव्यात त्याचा जरुर विचार केला जाईल, जेणे करून कार्यालये आणि सोबतच जिल्हयातील स्वच्छतेचाही प्रश्न सुटेल असे ते म्हणाले.


**जाहीर प्रगटन**

**मा.श्री. के. आर. जोगळेकर, जिल्हा न्यायाधीश -४, बीड यांचे न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज क्र :- १०/२०२५**

अर्जदार काशिनाथ पि. गोपीनाथ पवार, वय ६६ वर्षे, धंदा शेती, सेवालाल नगर, गेवराई ता. गेवराई जि.बीड.

विरूध्द गैरअर्जदार

१. महाराष्ट्र शासन मार्फत जिल्हाधिकारी, बीड २. सुनिता भ्र. काशिनाथ पवार, वय ६० वर्षे, धंदा घरकाम व शेती. रा. सेवालाल नगर, गेवराई ता. गेवराई जि.बीड.

अर्जदारातर्फे वकिल :-ॲड. एस. बी. देशपांडे, बीड.

मागणी - अज्ञानाचे नावे असलेली मालमत्ता हस्तांतरण/विक्री करण्याची परवानगी मिळणे बाबत. ज्याअर्थी अर्जदार काशिनाथ पि. गोपीनाथ पवार, वय ६६ वर्षे, धंदा शेती, रा.सेवालाल नगर, गेवराई ता. गेवराई जि. बीड यांनी या न्यायालयात असा अर्ज दिला आहे की, अर्जदाराचा अज्ञान नातु नामे स्वरांश पिता रवी पवार, वय ०६ वर्षे हा अज्ञान असुन अर्जदार हा अज्ञान स्वरांश पिता रवी पवार याचा आजोबा वडिलाचे वडील असुन अज्ञानाचा पालनकर्ता आहे. अर्जदाराने त्याचे स्वतःचे कमाईतुन कसबे गेवराई ता. गेवराई जि. बीड येथिल सर्व्हे नं.६४/अ नगर परीषद गेवराई हददीत प्लॉट क्र.५ ज्यास घर क्र.३५२६/१ नगर परिषदेने दिला असुन सदर प्लॉट अर्जदाराने पत्नी सुनिता व अज्ञान स्वरांश यांचे नावे खरेदी केलेला आहे. अज्ञानाचे नावे असलेली सदर मिळकत विकी/हस्तांतरण करण्याची परवानगी मिळणे बाबतचा अर्ज दाखल केला आहे. ज्याअर्थी कोणास यासंबंधी आक्षेप असेल तर त्यांनी सदरील प्रगटन प्रसिध्दीपासून (३०) तीस दिवसांच्या आत या न्यायालया समोर स्वतः किंवा वकिलामार्फत हजर रहावे, अन्यथा अर्जाची सुनावणी होवून नियमाप्रमाणे आदेश दिला जाईल. ज्याअर्थी कोणास यासंबंधी आक्षेप असेल तर त्यांनी सदरील प्रगटन प्रसिध्दीपासून (३०) तीस दिवसांच्या आत या न्यायालया समोर स्वतः किंवा वकिलामार्फत हजर रहावे, अन्यथा अर्जाची सुनावणी होवून नियमाप्रमाणे आदेश दिला जाईल.

आज दिनांक ०३/०१/२०२५ रोजी माझे सहिने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

प्रकरणातील पुढील तारीख १२/६/२०२५

शिक्का

आदेशावरून
स्वाक्षरित
**सहा अधिक्षक,**
जिल्हा न्यायालय, बीड
जावक क्रमांक १७५/२०२४
जिल्हा न्यायालय ४ बोड.
दिनांक ०३/०१/२०२५.


# भगवद् साधना ही मानवी जीवन कल्याणाची कला आहे–नारायण महाराज

बीड । प्रतिनिधी

मृत्युलोकात मानवी देह मिळाला आहे.त्यापुढे संसार व परमार्थ या बाबी येतात .संसारात रत झाले तर त्यात दुःख आहे व संसारात राहून भगवद्? भजन, परमार्थ केल्यास मानवी जीवन सुखमय होईल. म्हणूनच भगवद्? साधना ही मानवी जीवनाच्या कल्याणाची कला आहे असे प्रतिपादन हरिभक्ति परायण तपोनिधी गुरुवर्य नारायण महाराज उत्तरेश्वर पिंपरीकर यांनी विठ्ठल रुक्मिणी मंदिर, अंबिका नगर, पांगरी रोड बीड येथे काल्याच्या कीर्तनप्रसंगी केले आहे.

बीड येथील विठ्ठल मंदिर अंबिका नगर पांगरी रोड येथे विठ्ठल रुक्मिणी मंदिराच्या विसाव्या वर्धापन दिनानिमित्त व वै.उत्तमराव सारंगकर यांच्या ८व्या पुण्यस्मरणानिमित्त विसाव्या शतकातील महान संत हरिभक्ति परायण सद्गुरु ज्ञानेश्वर माऊली दादा यांच्या कृपाशीर्वादाने व तपोनिधी हभप नारायण महाराज श्री संत माऊली महाराज संस्थान उत्तरेश्वर पिंपरीकर यांच्या मार्गदर्शनाखाली व शुभ हस्ते व अजय सारंगकर गुरुजी व डॉक्टर गजानन सारंगकर यांच्या आयोजनातून संपन्न झालेल्या अखंड हरिनाम सप्ताहात काल्याच्या कीर्तनात ब्रह्मदिका नकळे खोळ/ ते हे आकळ धरियेली //१// या संत तुकाराम महाराज यांच्या चार चरणी अभंगातून हरिभक्ति परायण तपोनिधी नारायण महाराज हे भगवंत भक्ता करिता सगुण रुपात येतात हे सांगतात. आपल्या अभंग निरूपणातून बोलताना हरिभक्तिपरायण नारायण महाराज म्हणाले की, आपण सात दिवस अखंड



नामस्मरण केले आहे त्याची सांगता काल्याच्या कीर्तनाने होत असते. भगवंताने अनेक अवतार घेतले .वडील जे जे करतात त्यास धर्म म्हणतात व त्या धर्मासाठी व रक्षणासाठी भगवंतास प्रगट व्हावे लागते. रामाचा अवतार हा बंधनातील पण कृष्ण अवतार हा बंधनातील नाही .देव, संत यांना देश ,काल परिच्छेद नाही .संत हे ज्ञानरूपाने आपणात राहतात. देव व गोपाळ हे एकमेकात राहिले.

त्यांनी एकमेकाचे उष्टे खाल्ले. भगवंताची लीला देवाधिकांना आगम्यच आहे .भगवंताचा देह दिव्य आहे, माणसाचा पाच भुताचा आहे तर देवांचा तीन भुतांचा देह आहे. तो लीलाविग्रही आहे .गोकुळेत देवांनी मोहरी, पावा ,काठी धारण केली होती. गाईच्या मागे मागेतो धावला. मुरली वाजवली .हा गोपी बरोबर नाचला. गोपाळांना मुखातील ताक पाजले पण ते ब्रह्मादिकांना मिळाले नाही .म्हणजे त्याचे इंद्रिय त्यांच्या ताब्यात नव्हते पण गोपाळांची इंद्रियेताब्यात होती म्हणून त्यांचे इंद्रिये देवाकडे लावली. देवाचा आनंद भक्तांनाच मिळाला. तो देवादिकांना मिळाला नाही. गोपाळांना जो आनंद ज्याने दिला तोच देव आता विठोबा हाच गोकुळ येथील कृष्ण आहे. ही साधकांची माऊली आहे. तिचा सहवास भेटल्याने मानवी जीवन सफल होतेअसेही ते यावेळी म्हणाले. यावेळी हरिभक्त परायण नारायण महाराज गिरी (भागवताचार्य ) ,शिवाजीराव जाधव ,भास्करराव जाधव , रामहरी रसाळ गुरुजी, विभागीय प्रवक्ता अखिल भारतीय वारकरी मंडळ, श्री अनंत घीगे साहेब जिल्हा प्रसिद्धी प्रमुख वारकरी मंडळ व पत्रकार दैनिक रिपोर्टर, नारायण नागरे नाना, गचांडे गुरुजी, सुनील लांडगे, दिलीप वखरे, विठ्ठल कथले,अजय सारंगकर गुरुजी , डॉक्टर गजानन सारंगकर,अनंत कुलकर्णी देवा ,रामचंद्र कागदे गुरुजी, गायक म्हणून ह भ प चिंतामण महाराज मोरे , पांडुरंग महाराज गुरव ,अंगद महाराज सातपुते ,गोरख महाराज वायभट, मारुती महाराज कथले ,महारुद्र महाराज,रामकृष्ण खटाणे महाराज मृदंग वादक म्हणून: मृदंग महर्षि प्रमोद महाराज पदमुले तर असंख्य भाविक भक्त उपस्थित होते.

cmyk

# मोटारसायकलवरुन मोबाईल हिसकावणाऱ्या दोघांना अटक

## स्थानिक गुन्हे शाखेची उल्लेखणीय कामगिरी; तीन लाखांचा माल जप्त

बीड । प्रतिनिधी

बीड शहरामध्ये मोटारसायकलवर येवून जबरदस्तीने मोबाईल हिसकावून घेणाऱ्या दोघांना स्थानिक गुन्हा शाखेने जेरबंद केले असून त्यांच्याकडून दहा मोबाईल आणि मोटारसायकल असा २ लाख ८७ हजाराचा मुद्देमाल जप्त केला. ही कारवाई स्थानिक गुन्हे शाखेने केली.

अभिषेक दिनकर केदार वय २० व्य.शिक्षण रा.संतज्ञानेश्वर नगर यांनी पो.स्टे.शिवाजीनगर येथे फिर्याद दिली की, दि.११/०४/२०२५ रोजी रात्री ०९.१५ वा. सुमारास पिंपरगव्हाण रोड, गायत्री दुकानाच्या जवळ रोडवरुन घरी फोनवर मित्राला बोलत चालत जात असतांना पाठीमागुन काळया रंगाच्या स्प्लेंडर मोटार सायकलवर तिघेजण आले व त्यातील एका अज्ञात इसमाने माझा मोबाईल हिसकावुन घेवुन ते तिघे तेथुन निघुन गेले. वगैरे फिर्याद वरुन पो.स्टे.शिवाजीनगर बीड येथे गु.र.नं.२१०/२०२५ कलम ३०९(४),३(५) भा.न्या.सं.२०२३ अन्वये गुन्हयाची दि.१२/०४/२०२५ रोजी नोंद करण्यात आली आहे.

सदर गुन्हयाचा उकल करण्याचे दृष्टीकोणातुन मा.पोलीस अधीक्षक,बीड यांनी पोलीस निरीक्षक स्था.गु.शा.बीड यांना आदेश दिले. त्यावरुन पो.नि. स्था.गुशा.बीड यांनी आपले अधिपत्याखालील पोउपनि



सुशांत सुतळे व त्यांचे पथकाला गुन्हयाचे उघडकीस आणण्यासाठी योग्य ते मार्गदर्शन केले. पोउपनि सुशांत सुतळे यांनी त्यांची गोपनिय यंत्रणा सतर्क करुन दिनांक २८/०४/२०२५ रोजी स्थागुशा पथकाला गोपनिय माहिती मिळाली की, दोन इसम हे बीड शहरातुन वेगवेगळया ठिकाणाहुन मोबाईल हिसकावुन चोरुन नेलेले मोबाईल विकणेकामी समर्थ मंगल कार्यालय समोर ते अहिल्यानगर जाणाऱ्या रोडवर येणार असल्याची खात्रीलायक बातमी मिळाली तेव्हा सदर माहिती पो.नि. स्था.गु.शा. यांना देवुन त्यांनी तत्काळ पुढील कारवाई करणेचे आदेश दिल्याने स्थागुशा पथक बातमी ठिकाणी जावुन तेथे सापळा लावला असता एक मोटार सायकलवर दोन इसम आल्याचे दिसुन आले तेव्हा त्यांचेकडे जात असतांना त्यांनी तेथुन मो.सा.वर पळुन जाण्याचे प्रयत्नात असतांना त्यांना पथकाने पकडुन त्यांची नावे विचारली असता १) आदित्य बंकट नरवडे वय १९ वर्षे रा.बालेपीर ता.जि.बीड, २) नामदेव रामप्रसाद डोईफोडे वय १९ वर्षे रा.ईट ता.जि.बीड असे सांगितले. मोबाईल हिसकावुन चोरी केलेल्या घटनांबाबत बारकाईने विचारपुस केली असता आदित्य नवडे व त्यांचे इतर दोन साथीदार यांनी मिळुन मो.सा.वर जावुन मो.सा.वर जावुन मोबाईल बोलत चालत असलेल्या लोकांचे मोबाईल हिसकावुन चोरी केल्याची कबुली दिली असुन त्यांचे ताब्यातुन एकुण १० रिअल मी, सॅमसंग अल्ट्रा, रिअल मी, विवो, ओपो, पो.को. कंपनीचे मोबाईल व ◀◀ पान ३ वर



## स्वा.रा.ती.महाविद्यालयाच्या चार विद्यार्थ्यांची भारतीय सैन्यदलात निवड

अंबाजोगाई । प्रतिनिधी

येथील योगेश्वरी शिक्षण संस्था संचलित स्वामी रामानंद तीर्थ महाविद्यालयाच्या छात्र सेनेतील विद्यार्थ्यांची भारतीय सैन्य दलात निवड झाली आहे. गणेश माने, सय्यद सुभान करण खोडवे व आयुष नेमाने या छात्र सैनिकांचा महाविद्यालयाच्या वतीने सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी योगेश्वरी शिक्षण संस्थेचे सचिव कमलाकर चौसाळकर होते तर व्यासपीठावर जेष्ठ सल्लागार प्रा.एन. के.गोळेगावकर,प्राचार्यपी.आर.थारकर उपस्थित होते. प्रा. गोळेगांवकर म्हणाले की,देशप्रेमाचे, राष्ट्रप्रेमाचे बाळकडु छात्रसेनेतून मिळते.निडर,निधड्या छातीचा वीर घडला जातो

विद्यार्थ्यांनी कठोर मेहनत घेऊन यशाची शिखरे पादाक्रांत करावित असेही ते म्हणाले.

अध्यक्षीय समारोपात चौसाळकर म्हणाले की, ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाने उपलब्ध करून दिलेल्या संधींचे सोनं करावे, आपल्या आई वडिलांच्या स्वप्नांना मूर्त स्वरूपात उतरविण्याचा प्रयत्न करावा. कार्यक्रमाचे प्रास्ताविक छात्रसेना प्रमुख लेफ्टनंट डॉ.राजकुमार थोरात यांनी केले संचलन व आभार पी. डी.शिंपले यांनी मानले. रमेश सोनटक्के कनिष्ठ विभागाचे उपप्राचार्य प्रा.डॉ.जितेंद्र देशपांडे, यांच्यासह प्राध्यापक,शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

## ऐनोद्दीन वारसी यांच्या बासरी वादनाने रसिक मंत्रमुग्ध



अंबाजोगाई । प्रतिनिधी

संगीत साधना मंच अंबाजोगाईच्या वतीने मासिक शास्त्रीय संगीत सभेत पं.रोणू मुजुमदार यांचे शिष्य एनोद्दीन वारसी यांच्या बासरी वादनाने रसिक मंत्रमुग्ध झाले त्यांनी राग किरवाणीने आपल्या वादनाची सुरुवात केली. वाद्य संगीतातील वादन परंपरेनुसार जोड झाला यानंतर मध्यलयीतील तीन तालात वादनाची सुरुवात झाली.

यानंतर रागदेस मधील झपताल गतीने त्यांनी आपल्या वादनाची रसिकांच्या मनावरील पकड कायम ठेवली. यानंतर राग पिलू मधील धून आणि वाद्य राग पहाडी मधील स्वरचित धून वाजवून वादनाची सांगता केली. या बासरी वादनाला तबल्यावर रत्नदीप शिगे यांनी साथ केली. या संगीत सभेस महिला,रसिक उपस्थित होते.

## महावितरणच्या गलथान कारभाराचा भडका!

## पाटोद्यात शॉर्टसर्किटमुळे शेतात भीषण आग; हजारोंचं नुकसान

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा शहरातील राऊतवस्ती परिसरात मंगळवारी दुपारी दोनच्या सुमारास महावितरणच्या ढिल्या आणि झुकलेल्या विद्युत तारांमुळे शॉर्टसर्किट होऊन नगरसेवक तथा शेतकरी बाबुराव जाधव यांच्या शेतात भीषण आग लागली. या आगीत कडबा, ज्वारी आणि इतर वैरणीचा साठा जळून खाक झाला असून, शेतात बांधलेल्या म्हशीला गंभीर इजा झाली आहे. अंदाजे हजारो रुपयांचे नुकसान या दुर्घटनेत झालं आसुन.

ही आग शेजाऱ्यांनी पाहताच ग्रामस्थांनी पाण्याच्या मोटारी, पाइपच्या साहाय्याने आग विझवण्याचा प्रयत्न केला. मात्र, आगीने रौद्र रूप घेतल्याने



नुकसान टाळता आलं नाही. विशेष म्हणजे, येरवी रस्ते धुताना सहज दिसणारी नगरपंचायतीची अग्निशामक गाडी, प्रत्यक्ष संकटसमयी मात्र कुठेही दिसली नाही.''ही अग्निशमन व्यवस्था केवळ शोभेची आहे का? वेळ आली तर मदतीला कोणीच नाही! ही लज्जास्पद शोकांतिका आहे,'' अशी तीव्र प्रतिक्रिया पाटोदा नगरपंचायतचे नगरसेवक बाबुराव जाधव यांनी दिली आहे.या दुर्घटनेमुळे महावितरणच्या आणि स्थानिक प्रशासनाच्या निष्क्रियतेवर नागरिकांत प्रचंड संताप आहे. जबाबदार अधिकाऱ्यांवर तातडीने कारवाई करून शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्याची मागणी होत आहे.

## निराधार वयोवृद्धांना शासनाकडून मदत की मदतीच्या नावाखाली त्यांची हेळसांड

### मागील तीन ते सहा महिन्यांपासून ते मानधनापासून वंचित

अंबाजोगाई । प्रतिनिधी

शासन वयोवृद्धांसाठी निराधार योजना, श्रावण बाळ योजना अशा विविध प्रकारच्या योजना राबवित आहे. गेली अनेक वर्षे या योजना व्यवस्थित पणे तथा सुरळीत चालू होत्या. मात्र मागील काही काळापासून केवायसी च्या गोंडस नावाखाली या योजनेचा बोजवारा उडत असल्याचे दिसून येत आहे. या योजनांचा लाभ घेणारे बहुतांश जण हे साठ ते सत्तरी पूर्ण झालेले वयोगटातील जेष्ठ नागरिक आहेत. त्यांना एकतर केवायसी हा प्रकारचं माहिती नसल्याने ते कधी बँकेत तर कधी आधार दुरुस्ती सेंटर तर कधी महा ई सेवा केंद्रावर हेलपाटे मारताना आढळून येत आहेत. त्याठिकाणी तीन तीन चार चार तास ताटकळत थांबून सुद्धा त्यांना कोणीही व्यवस्थित पणे बोलत नाहीत किंवा माहिती देत नाहीत.तेव्हा त्यांच्या तोंडून आपसूकच शासनाविषयी अनास्था निर्माण झाल्याशिवाय राहत नाही. सरकार आम्हाला मदत करते आहे की आमची थट्टा असा निराशाजनक भावनिक सूर त्यांच्या मुखातून निघाल्याशिवाय रहात नाही.

शासनाकडून मिळालेल्या आर्थिक मदतीवरच अनेक निराधार वृद्धांचे ◀◀ पान ३ वर

> बँकेत डी बी टी केल्याशिवाय कुणालाही मानधन मिळणार नाही असा शासननिर्णय असल्याने ज्यांनी दिपावली २०२४ पासून अनेक लाभार्थी मानधनापासून वंचित आहेत. ज्यांनी बँकेत डीबीटी केली आहे त्यांच्या खात्यांवर पैसे जमा होत आहेत--- श्याम सरवदे, सामाजिक कार्यकर्ते (मानवलोक)

## राजेश टोपे यांच्या प्रयत्नातून रखडलेला रस्ता अखेर पूर्ण

अंबड । प्रतिनिधी

माजी मंत्री राजेश टोपे यांच्या प्रयत्नातून आणि वनविभाग आणि सा बा खाते यांच्या सहकार्यातून नांदी जवळील रखडलेला रस्ता अखेर पूर्ण झाला. याविषयीं माजी मंत्री राजेश टोपे यांनी विशेष प्रयत्न केले, श्री टोपे यांनी छत्रपती संभाजी नगर येथील वनसंरक्षक प्रमोदचंद लाकरा, जालना येथील सहाय्यक

वनसंरक्षक एस एन मुंढे, व्ही एम दौंड वनपरीक्षेत्र अधिकारी दक्षिण विभाग जालना यांच्या कडे सतत पाठपुरावा केला, सा बा चे कार्यकारी अभियंता यांच्या कडे पाठपुरावा करून प्रस्ताव वनविभाग यांना पाठवून सदर रस्ता कामाची मंजुरी आणून प्रत्यक्ष रस्ता काम करणारी कन्स्ट्रक्शन श्री देविदान यांच्या कडून काम पूर्ण करे पर्यंत श्री राजेश टोपे




यांच्या संपर्क कार्यालयाकडून केशव अटकर यांनी सातत्याने पाठपुरावा केला, या रस्त्यावर सातत्याने वाहन चालकांचे भांडण वादविवाद होत असे, रोहिलगड आणि जामखेड पंचक्रोशी तील सर्व नागरिकांची यामुळे अडचण दूर झाली आहे.

## योग्य व्यायामाने मेंदूच्या क्षमतेत वाढ-डॉ.जगदीश टेकाळे

**पाटोदा । प्रतिनिधी**

शरीराच्या इतर अवयवांप्रमाणे मेंदूला योग्य काळजी आणि व्यायामाची आवश्यकता असते. जीवनशैलीतील बदल, नियमित व्यायाम आणि चांगल्या सवयींद्वारे मेंदूचे कार्य सुधारता येते. आठवड्यातून अनेक वेळा चालणे, सायकलिंग किंवा पोहणे यांसारखा व्यायाम किमान २०-३० मिनिटे केल्याने मेंदूची कार्यक्षमता वाढू शकते. त्याचबरोबर वाचन, कोडी सोडवणे किंवा नवनवीन गोष्टी शिकणे यांसारख्या क्रिया मेंदूला आव्हान देतात आणि क्षमता निर्माण करण्यास मदत करतात, असेही ते म्हणाले.

त्यामध्ये प्रत्येकाने दररोज ७-८ तासांची झोप घेतली पाहिजे, जेणेकरून मेंदूला विश्रांती मिळेल. नियमित व्यायाम केल्याने मेंदूमध्ये रक्तप्रवाह वाढेल आणि स्मरणशक्ती सुधारेल. संतुलित आहार मेंदूच्या आरोग्यास आवश्यक पोषक तत्त्वे आणि अँटीऑक्सिडंट्स देतो. कोडी सोडवा, पुस्तके वाचा, मेंदूचे खेळ खेळा. नवीन भाषा, नृत्य किंवा फोटोग्राफी यांसारखे नवीन कौशल्य शिकण्याचा प्रयत्न करा. मित्रांशी मनमोकळ्या गप्पा मारा. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे ताण कमी करण्यासाठी आणि मेंदूचे आरोग्य वाढवण्यासाठी दीर्घ श्वसन करत ध्यान करणे किंवा योगासने करणे आवश्यक आहे, असे मत डॉ.जगदीश श्रीराम टेकाळे एम.बी.बी.एस., एम.डी. मानसोपचार तज्ञ (गोल्ड मॅडॅलिस्ट)न्युरो सायकियाट्रिस्ट, व्यसनमुक्ती तज्ञ, सेक्सोलॉजीस्ट यांनी व्यक्त केले. डॉ.जगदीश टेकाळे महिन्याच्या दुसऱ्या व चौथ्या रविवारी बीड शहरात साई(गावते कॉम्प्लेक्स, डी.पी.रोड,डॉक्टर लाईन,बस स्टॅण्डच्या पाठीमागे येथे उपलब्ध असतात. मो.९५१८५५१५०३, ९५४५६१५३५२

## ४५ टक्के शेतकऱ्यांची फार्मर आयडीसाठी नोंद

**पाटोदा । प्रतिनिधी**

शासनाकडून शेतकऱ्यांना दिले जाणारे शेतकरी ओळखपत्र फार्मर आयडी नोंदणी प्रक्रिया पाठवता तालुक्यात मंद गतीने सुरू आहे तालुक्यातील केवळ ४५% शेतकऱ्यांनीच शेतकरी ओळखपत्र प्राप्त केले असून अध्याप ५५% शेतकऱ्यांची आपली नोंदणी केलेली नाही राहिलेल्या शेतकऱ्यांसाठी प्रशासन आता गावागावात जाऊन शिबिर घेऊन शेतकरी ओळखपत्र नोंदणी संदर्भात जनजागृती केली जात आहे. तालुका प्रशासनाकडून गावागावात जनजागृती सुरू केली आहे. अशी माहिती तहसीलदार दत्तात्रय निलवाडी यांनी दिली आहे. पाटोदा तालुक्यातील शेतकरी खातेदारांची संख्या ६५००० आहे परंतु येथील केवळ २५ हजार ते २६ हजार शेतकऱ्यांनी शेतकरी ओळखपत्र साठी नोंदणी पूर्ण केली आहे शासकीय योजनांसाठी हे ओळखपत्र अनिवार्य आहे असे प्रशासनाकडून सांगण्यात येत आहे ओळखपत्रासाठी ◀◀ पान ३ वर

## आर बी आय आणि गजानन बँकेच्या वतीने सायबर सुरक्षा कार्यशाळा



बीड । प्रतिनिधी

भारतीय रिझर्व बँक व श्री गजानन नागरी सहकारी बँक लिमिटेड बीड यांच्या संयुक्त विद्यमाने सायबर सुरक्षा कार्यशाळा दिनांक २८ /४/ २०२५ रोजी सोमवारी सकाळी वेळ १०.३० वाजता बँकेचे उपाध्यक्ष जगदीश काळे यांच्या अध्यक्षतेखाली हॉटेल ग्रँड यशोदा बार्शी रोड, बीड येथे आयोजित करण्यात आली होती. सदर कार्यशाळेला बँकेचे मुख्य ◀◀ पान ३ वर

## अक्षय्य तृतीयेला आमरसावर ताव मारूनच होते आंब्याच्या हंगामाची सुरूवात

### रसायनांचा वापर करून उत्पादित केलेल्या आंब्याच्या अनेक जाती बाजारात उपलब्ध; आधुनिक काळात पारंपरिक गावरान आंबा होतोय नामशेष

ज्योतिराव पांढरपोटे । माजलगाव

वैशाख म्हटले की हमखास पुरणपोळी आणि आमरसाचा बेत निश्चित असतो. आजच्या दिवशी म्हणजे अक्षय्य तृतीयेला आंब्याच्या आमरसावर ताव मारूनच या हंगामाची सुरूवात होते. मात्र निसर्गाच्या अवकृपेमुळे शेत शिवारातील बांधावरची आंब्याची झाडे कमी होऊ लागल्याने गावरान आंबा आता नामशेष होत आहे.

माजलगाव तालुक्यात वीस वर्षांपूर्वीपर्यंत ग्रामीण भागातील शेताच्या बांधावर गावरान आंब्याची अनेक झाडे असायची.एखादा शेतकरी वगळता प्रत्येकाच्या शेतात किमान एकतरी गावरान आंब्याचे झाड हमखास असायचे.खरीप पेरणीपूर्व मशागतीनंतर गर्द गावरान आंब्याच्या सावलीत शेतकरी दुपारची विश्रांती घ्यायचे.गेल्या काही वर्षांपासून सुरू असलेल्या वृक्षतोडीने आंब्याची झाडे कमी होऊ लागली आहेत. उन्हाळ्याच्या दिवसात गावामध्ये

प्रत्येक घरांत आंब्याची आढी ठरलेली असायची. अलीकडच्या काळात गावरान आंब्याबरोबर आढी आता दुरापास्त झाली आहे.काही भागात आंब्याची झाडे शिल्लक आहेत,पण तेथेही वाढते तापमान अवकाळी पावसाचा तडाखा, गारपीट अशा वातावरणामुळे फळधारणा झालेली नाही.हवामानातील बदल,वृक्षतोड,शेत शिवारात महागड्या औषधांचा वाढता वापर यामुळे ग्रामीण भागातून गावरान आंब्याची झाडे कमी होऊ लागली आहेत. गावरान आंब्याच्या आमरसाची मेजवानी काळाच्या पडद्याआड गेली आहे.सर्वसामान्यांना गावरान आंबा विकत घेणे परवडतो परंतु सध्या शेतकऱ्यांची अशी आमराई दुर्मिळ होत आहे. गावरान आंब्याची जागा आता कृत्रिम रसायने वापरून पिकलेल्या आंब्याने घेतल्यामुळे गावरान आंब्याचे दर्शन बाजारात नामशेष होत चालले आहे.आज

दि ३० एप्रिल बुधवार रोजी अक्षय तृतीयाच्या सणानिमित्त शहरातील बाजारात हापूस, केसर,बदाम,पायरी मलाईका, तोतापुरी,लंगडा, दशेरी आदी विविध आंब्याचे प्रकार बघायला मिळाले.



This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# टेमघर धरणातून होणारी पाणीगळती रोखण्यासाठी ४८८ कोटींच्या खर्चाला मान्यता

**पुणे । प्रतिनिधी**

**टेमघर धरणातून होणारी पाण्याची गळती रोखण्यासाठी ४८८ कोटी ५३ लाख रुपयांचा खर्चाला मंत्रिमंडळाच्या बैठकीत मंगळवारी मान्यता देण्यात आली आहे. मात्र अवघ्या महिनाभरावर पावसाळा सुरू होत असल्याने पाणी गळती रोखण्याचे काम हे दिवाळी नंतरच सुरू होण्याची शक्यता आहे.**



टेमघर धरणातील गळती रोखण्यासाठी जून २०२० पर्यंत अत्यावश्यक कामे करण्यासाठी राज्य सरकारने ३२३ कोटी रुपयांच्या निधीला यापूर्वी मान्यता दिली होती. मात्र भूसंपादन व धरणाची अन्य कामेही करणे आवश्यक असल्याने खर्च वाढला व हा खर्चाचा आकडा ४८८ कोटींपर्यंत पोचला गेला. धरणाच्या कामात भूसंपादन करण्यात आले. पण या भूसंपादनासंदर्भात न्यायालयातही काही प्रकरणे प्रलंबित होती. न्यायालयाने दिलेल्या निकालानंतर मोबदलादेखील शेतकऱ्यांना देण्यात आला.

परिणामी या कामांचा खर्च सुमारे ४८८ कोटींपर्यंत पोचला. मात्र, मंजूर खर्चापेक्षा उर्वरित निधीला मान्यता नसल्याने ही बिले जलसंपदा विभागाकडून मंजूर करता येत नव्हती. राज्य मंत्रिमंडळाने आज ४८८ कोटी ५३ लाख रुपयांच्या खर्चाला मान्यता दिल्याने आता या बिलांचा मार्ग मोकळा झाला आहे.

राज्य मंत्रिमंडळाने फेब्रुवारी महिन्यात झालेल्या बैठकीत टेमघर धरणातील पाणीगळती रोखण्यासाठी करण्यात येणाऱ्या कामांसाठी अतिरिक्त ३१५ कोटी ५ लाख रुपयांच्या प्रशासकीय खर्चाला मान्यता दिली आहे. या संदर्भात अंदाजपत्रक तयार करण्याचे काम सुरू असून त्याला मंजुरी मिळाल्यानंतर निविदा प्रसिद्ध केल्या जाणार असल्याचे सूत्रांनी सांगितले.पुणे शहराच्या पाणी पुरवठ्यासाठी अत्यंत महत्वाचे असे टेमघर धरण तातडीने दुरुस्त करण्याची पावले उचलण्याचे राज्य सरकारने ठरवले आहे. धरणातून मोठ्या प्रमाणात पाणी गळती होत आहे. पुण्याच्या ऊर्ध्व भागात वसलेले हे धरण पुणे महानगरासाठी धोकायदायक ठरू शकेल असा इशारा तज्ज्ञ समित्यांनी वेळोवेळी दिला होता.

जलसंपदेसंबंधी केंद्रीय तसेच राज्य सरकारच्या विविध समित्यांनी या दुरुस्त्या लौकर कराव्या लागतील असा इशारा वारंवार दिला होता. जलसंपदा विभागाने या संबंधी मंत्रीमंडळाला सादर केलेल्या टिप्पणीत असे स्पष्ट नमूद केले होते की धरण सुरुक्षितता कायदा २०२१ मधील विविध कलमे टेमघरला लागू होतात. जर यातून काही दुर्घटना घडली तर पुणे शहराला त्याचा मोठा धोका उद्भवू शकतो. तसेच यातून निर्माण होणाऱ्या कायेदशीर कटकटीही अधिक मोठ्या असू शकतात.

# गाडीचा हॉर्न वाजवल्यावरुन वाद; पुण्यातील भवानी पेठेत फ्री-स्टाईल हाणामारी

पुणे । प्रतिनिधी

पुण्यातील (झींपश) मध्यवर्ती आणि नेहमी गजबजलेल्या भवानी पेठ (इहर्रींरपळ झशींह) भागात केवळ गाडीचा हॉर्न वाजवण्याच्या क्षुल्लक कारणावरून दोन गटांमध्ये कपडे फाटेपर्यंत फ्री-स्टाईल हाणामारी झाली. दुचाकीस्वाराने रस्ता ओलांडणाऱ्या एका पादचार्याला हॉर्न दिला आणि या किरकोळ घटनेने काही क्षणांतच हिंसक रूप करत दोन गटामध्ये तूफान हाणामारी झाली.



या मिळलेल्या माहितीनुसार, भवानी पेठेतून दुचाकीवरून जात असलेल्या तरुणाने समोरून रस्ता ओलांडणाऱ्या व्यक्तीला हॉर्न दिला. या हॉर्नचा राग मनात धरून संबंधित व्यक्तीने दुचाकीस्वाराशी वाद घातला. यानंतर दोन गटात कपडे फाटेपर्यंत फ्री-स्टाईल हाणामारी झाली. रस्त्यावर चालू असलेल्या या हाणामारीमुळे परिसरात एकच खळबळ उडाली होती. या घटनेचा व्हिडिओ सोशल मीडियावर प्रचंड व्हायरल झाला आहे.

खडक पोलिसांकडून एका आरोपीला अटक

घटनेची माहिती मिळताच खडक पोलीस ठाण्याच्या पथकाने तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी या प्रकरणी एका आरोपीला अटक केली आहे. पोलिसांकडून पुढील तपास सुरु आहे. दरम्यान, सार्वजनिक ठिकाणी केवळ हॉर्न वाजवल्याच्या कारणावरून असा हिंसाचार होणे, हे गंभीर बाब मानली जात असून पुण्यातील वाढत्या गुन्हेगारीवर नियंत्रण मिळवण्यासाठी पोलीस काय उपाययोजना राबवणार? हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

# तलाठ्याचा विहिरीत मृतदेह आढळल्याने उडाली खळबळ

शिरूर । प्रतिनिधी

पाबळ (ता. शिरूर) येथे कार्यरत असलेले गावकामगार तलाठी पवन अशोक बांदल (वय ३१, रा. करडे, ता. शिरूर, जि. पुणे) यांचा मृतदेह आज सकाळी त्यांच्याच करडे येथील शेतातील विहिरीत आढळून आल्याने खळबळ उडाली. विहिरीवरील मोटार चालू करण्यासाठी गेले असता ते पाय घसरून विहिरीत पडले असावेत, असा प्राथमिक अंदाज त्यांच्या कुटूंबियांनी व्यक्त केला आहे.

मृत पवन बांदल यांचे बंधू श्रीनिवास अशोक बांदल यांनी शिरूर पोलिसांना कळविल्यानंतर पोलिसांनी स्थानिकांच्या मदतीने त्यांचा मृतदेह विहिरीतून बाहेर काढला. याबाबत शिरूर पोलिस ठाण्यात अकस्मात मृत्युची नोंद करण्यात आली.



पोलिसांनी दिलेल्या माहितीनूसार, गेल्या सात महिन्यांपासून पाबळ येथे गावकामगार तलाठी म्हणून कार्यरत असलेले पवन बांदल हे नेहमीप्रमाणे आज सकाळी साडेनऊ वाजण्याच्या सुमारास दूचाकीवरून पाबळ येथे जाण्यास निघाले असता त्यांचे बंधू श्रीनिवास यांनी, 'जाताना आपल्या शेतातील विहिरीवरील मोटार चालू करून जा', असे सांगितले. त्यास होकार देऊन ते निघून गेले.

दरम्यान, श्रीनिवास हे पावणेबारा वाजण्याच्या सुमारास शेतात काम करण्यासाठी गेले असता शेतात पाणी न आल्याने पवन हा मोटार चालू करण्यास विसरला असावा असे वाटल्याने ते स्वतः विहिरीकडे गेले. तेव्हा विहिरीच्या कडेला बंधू पवन यांची दूचाकी लावलेली होती व दूचाकीवर त्यांच्या लॅपटॉपची बॅगदेखील ठेवली होती.

श्रीनिवास यांना संशय आल्याने त्यांनी विहिरीत डोकावून पाहिले असता विहिरीतील पाण्यावर पवन यांचा मृतदेह तरंगताना आढळून आला. त्यावेळी त्यांनी आरडाओरडा करून कुटूंबियांना व शेजाऱ्यांना बोलाविले. त्याचवेळी पोलिसांनाही कळविले.पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेऊन पवन बांदल यांचा मृतदेह स्थानिकांच्या मदतीने विहिरीतून बाहेर काढला. पवन याला लहानपणापासून पोहता येत नव्हते. विहिरीतील मोटार चालू करताना कदाचित तोल जावून तो विहिरीत पडला असावा, असा प्राथमिक अंदाज त्यांनी व्यक्त केला.अभियांत्रिकीचे शिक्षण पूर्ण केल्यानंतर पवन बांदल हे तलाठी परीक्षा उत्तीर्ण झाले होते. सध्या ते पाबळ येथे गावकामगार तलाठी म्हणून कार्यरत होते. त्यांच्या मृत्युने परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. याबाबत शिरूर पोलिस ठाण्यात अकस्मात मृत्युची नोंद करण्यात आली असून, पोलिस निरीक्षक संदेश केंजळे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस हवालदार शिवाजी भोते पुढील तपास करीत आहेत.

# दोन वेगवेगळ्या घटनांत तब्बल १ कोटी १५ लाख रुपयांची फसवणूक

पिंपरी । प्रतिनिधी

'दहा मिनिटांत श्रीमंत व्हा !', 'दररोज १०० डॉलर कमवा !', '२० टक्के हमखास नफा मिळवा !', अशा मोहक वाक्यांच्या जाळ्यात अडकून अनेकजण लाखो रुपये गमावत आहेत. पिंपरी-चिंचवड शहरात एकाच दिवशी अशा फसवणुकीच्या दोन घटना उघड झाल्या असून यामध्ये तब्बल १ कोटी १५ लाख रूपयांना गंडा बसला आहे. त्यामुळे नागरिकांनी सावध राहण्याचे आवाहन पोलिसांनी केले आहे.

रावेत येथे घडलेल्या पहिल्या प्रकरणात, एका नागरिकाला अनोळखी व्यक्तीकडून फोन आला. त्या व्यक्तीने बिटकॉइन आणि युएसडीटी या डिजिटल करन्सीमध्ये गुंतवणूक केल्यास दररोज १०० डॉलर नफा मिळेल, असे आमिष दाखवले. सुरुवातीला विश्वास संपादन करण्यासाठी काही बनावट व्यवहार दाखवण्यात आले. त्यानंतर आरोपीने फिर्यादीला एक लिंक पाठवून नफ्याच्या रकमेतून २० टक्के कमिशन भरण्याची अट ठेवली. आरोपीने वेळोवेळी वेगवेगळ्या बँक खात्यांमध्ये पैसे भरण्यास सांगितले आणि एकूण ९६ लाख ९३ हजार २८९ रुपये उकळले. मात्र, एकदा पैसे जमा झाल्यावर आरोपीने संपर्क तोडला. याप्रकरणी पिंपरी-चिंचवड सायबर पोलिस ठाण्यात तक्रार दाखल झाली असून पुढील तपास सुरू आहे.



तळेगाव दाभाडे येथे घडलेल्या दुसर्या प्रकरणात, राकेश चौधरी यांच्याशी आरोपी महिलेने संपर्क साधला. आर्या फायनान्स अलायन्स या कंपनीत गुंतवणूक केल्यास २० टक्के नफा मिळेल, असे सांगून त्यांना एका व्हॉट्स ॲप ग्रुपमध्ये जोडण्यात आले. तिथे इतर सदस्यांनी मोठ्या नफ्याच्या बनावट चॅट्स आणि मेसेजेस पाठवले. चौधरी यांच्या नावाने एका बनावट खात्यात ७० ते ८० लाख रुपये जमा झाल्याचे दाखवून त्यांचा विश्वास संपादन केला. चौधरी यांनी १८ लाख १२ हजार रुपये गुंतवले. मात्र, नफा मिळणे दूरच राहिले, उलट गुंतवलेली रक्कमही परत मिळाली नाही. आरोपीने नंतर चौधरी यांच्याशी संपर्क तोडला. या प्रकरणी तळेगाव दाभाडे पोलिस तपास करीत आहेत.

# ग्रामदैवत श्री भैरवनाथ महाराज उत्सवा निमित्त बाणेर केसरी कुस्ती स्पर्धेचे आयोजन

**बाणेर । प्रतिनिधी**

**दरवर्षी प्रमाणे यंदाही बाणेर गावचे ग्रामदैवत श्री भैरवनाथ महाराज यांचा उत्सव साजरा होणार आहे. या निमित्ताने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले असून दि.३० एप्रिल रोजी श्री भैरवनाथ महाराजांची पालखी सोहळा होणार आहे.**




त्याचप्रमाणे रात्री ९ वाजता गौतमी पाटील यांचा बाणेर येथे सीमा पार्क, धनकुडे फॉर्म हाउस जवळ, सावतामाळी मंदिरा समोर सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित करण्यात आलेला आहे. दि.१ मे रोजी सकाळी ९ वाजता बाणेर येथील कै. सोपानराव बाबुराव कटके विद्यालयातील मैदानावर महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघटनेच्या मान्यतेने व पुणे शहर कुस्तीगीर संघटनेच्या सहकार्याने मॅटवरील बाणेर केसरी कुस्ती स्पर्धा आयोजित केली आहे.

या स्पर्धेचे उद्घाटन समारंभ महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री तथा पुणे जिल्ह्याचे पालकमंत्री अजित पवार यांच्या शुभहस्ते त्याचप्रमाणे स्थायी समितीचे माजी अध्यक्ष तथा महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशनचे सरकार्यवाह बाबुराव चांदेरे, योगीराज नागरी सहकारी पतसंस्थेचे संस्थापक अध्यक्ष तथा बाणेरचे प्रथम नगरसेवक ज्ञानेश्वर तपकीर, बाणेर नागरी सहकारी पतसंस्थेचे संस्थापक दिलीप मुरकुटे यांच्या प्रमुख उपस्थितीत आयोजित करण्यात आलेला आहे. दरम्यान, या स्पर्धेमध्ये गटवारी केली असून त्यांची बक्षिसे पुढील प्रमाणे देण्यात येणार आहेत.

# जिजाऊ रथ यात्रेचा महाराष्ट्र दिनी समारोप

**पुणे । प्रतिनिधी**

**मराठा सेवा संघ, संभाजी ब्रिगेड, जिजाऊ ब्रिगेड आणि इतर संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेला मराठा जोडो अभियानांतर्गत जिजाऊ रथयात्रेचा समारोप महाराष्ट्र दिनाच्या दिवशी करण्यात येणार आहे, अशी माहिती मराठा सेवा संघाचे विजयकुमार ठुबे आणि संभाजी ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष चंद्रशेखर घाडगे यांनी पत्रकार परिषदेत दिली.**




या पत्रकार परिषदेला संभाजी ब्रिगेडचे शहराध्यक्ष अविनाश मोहिते, जिल्हा सरचिटणीस सिध्दार्थ कोंढाळकर, शहर उपाध्यक्ष जोतिबा नरवडे आणि जिल्हा कार्याध्यक्ष साजिद सय्यद उपस्थित होते. यावेळी बोलताना ठुबे म्हणाले, या रथयात्रेची सुरुवात दि. १८ मार्च रोजी वेरुळ येथून झालेली आहे. दि. ३० एप्रिल रोजी पौड येथे या रथयात्रेचे आगमन होणार असून तेथे स्वागत करण्यात येणार आहे. सायंकाळी पिंपरी येथे रथाचा मुक्काम राहणार आहे. दि. १ मे रोजी सकाळी ९ वाजता दापोडी येथून रथयात्रेला सुरुवात होणार आहे. विमाननगर चौक मार्गे चंदननगर, हडपसर, आझम कॅम्पस, स्वारगेट मार्गे सायंकाळी ५ वाजता लाल महाल येथे पोहोचणार आहे. मान्यवरांच्या हस्ते राजमाता जिजाऊ आणि छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करुन ही रथयात्रा शिवाजीनगर गावठाण येथील छत्रपती शिवाजी व्यायाम मंडळ येथे जाणार असल्याचे ठुबे यांनी यावेळी सांगितले.

या रथयात्रेचा समारोप छत्रपती शिवाजी व्यायाम मंडळ येथे होणार आहे. हा कार्यक्रम सायंकाळी ६ वाजता होणार असून कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मराठा सेवा संघाचे संस्थापक अध्यक्ष पुरुषोत्तम खेडेकर उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमाला संघाचे अध्यक्ष विजय घोगरे, माजी न्यायमुर्ती बी. जी. कोळसे पाटील, जिजाऊ रथयात्रा प्रमुख सौरभ खेडेकर, माजी आमदार रेखा खेडेकर, माजी पोलिस अधिकारी एस. एम. मुश्रीफ, शाहीर संभाजी भगत, महासचिव चंद्रशेखर शिखरे, संभाजी ब्रिगेडचे प्रदेशाध्यक्ष ॲड. मनोज आखरे, केंद्रिय निरीक्षक विकास पासलकर, अखिल भारतीय मराठा महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष राजेंद्र कोंढरे, संभाजी ब्रिगेडचे प्रवीण गायकवाड, महाराष्ट्र स्वराज्य पक्षाचे सरचिटणीस धनंजय जाधव यांसह विविध पक्ष आणि संघटनांचे पदाधिकारी उपस्थित राहणार असल्याचे घाडगे यांनी यावेळी सांगितले.

# शिरूर तहसीलदारांच्या आदेशाला विरोध; चार जणांविरुद्ध गुन्हा दाखल

**शिरूर । प्रतिनिधी**

**शिरूर तालुक्यातील शिरसगाव काटा येथील एका वादग्रस्त रस्त्याच्या खुल्या वापराबाबत तहसीलदारांनी दिलेल्या आदेशाला स्थानिक चार व्यक्तींनी थेट विरोध दर्शवून प्रशासनालाच आव्हान दिले आहे. याप्रकरणी संबंधित आरोपींविरुद्ध शिरूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**




याबाबत फिर्यादी प्रमिला नागेश वानखेडे (वय ४२, व्यवसाय - तलाठी, रा. खराडी बायपास, ता. हवेली, जि. पुणे) यांनी शिरूर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार पोलिसांनी ताराबाई पोपट भोईटे, खंडू पोपट भोईटे, महेश पोपट भोईटे, दादा पोपट भोईटे (सर्व रा. शिरसगाव काटा, ता. शिरूर, जि. पुणे) यांच्यावर गुन्हा दाखल केला आहे.

याबाबत अधिक माहिती अशी कि, २८ एप्रिल २०२५ रोजी सायंकाळी ४ वाजण्याच्या सुमारास मौजे शिरसगाव फाटा ते पिंपळसूटी या रस्त्याच्या तात्पुरत्या खुल्या वापरासंदर्भात तहसीलदार यांनी स्पष्ट आदेश दिला होता. त्यानुसार फिर्यादी व प्रशासकीय अधिकाऱ्यांनी संबंधित आरोपीना रस्ता खुला करण्याची विनंती केली. मात्र, आरोपींनी स्पष्ट शब्दांत प्रशासनाच्या आदेशास विरोध केला होता.

त्यावेळी आरोपी खंडू भोईटे याने उघडपणे सांगितले की, आम्ही कोणाचाही आदेश पाळणार नाही. आमची जमीन मोजणी होईपर्यंत आम्ही रस्ता मोकळा करणार नाही. तुम्हाला काय ते गुन्हा दाखल करा. यावेळी इतर आरोपींनीही यास दुजोरा दिला. या प्रकारामुळे तहसीलदारांच्या आदेशाचा थेट अवहेलना झाल्याने, संबंधित चार जणांविरुद्ध शिरूर पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला आहे.या प्रकरणाचा तपास पोलीस हवालदार शिंदे तपास करत असून या प्रकरणाच्या तपासासाठी प्रभारी अधिकारी म्हणून पोलीस निरीक्षक संदेश केंजाळे यांच्याकडे जबाबदारी देण्यात आली आहे. या घटनेमुळे प्रशासनाचे आदेश न पाळल्यास कायदेशीर कारवाई कशी होऊ शकते, याचे ठोस उदाहरण निर्माण झाले आहे. शासकीय आदेशांना विरोध करून कायदा हातात घेण्याचा प्रयत्न करणाऱ्यांविरुद्ध पोलीस यंत्रणा तत्पर आहे, हे या प्रकरणातून स्पष्ट झाले आहे.

# पुण्यात चांदणी चौकात बसचा ब्रेक फेल; अनेक वाहनांना धडक, दोन जण गंभीर जखमी

**पुणे । प्रतिनिधी**

**पुण्यातील चांदणी चौकात एक भीषण अपघात घडला. कोथरूडच्या दिशेने येणाऱ्या पीएमपीएल बसचा ब्रेक अचानक फेल झाल्याने बसने वेगाने येत चार ते पाच दुचाकी आणि एका रिक्षाला जोरदार धडक दिली. या धडकेत दोन जण गंभीर जखमी झाले असून, त्यांना तातडीने जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.**



प्राथमिक माहितीनुसार, चांदणी चौकातून खाली उतरताना बसचा ब्रेक अचानक निकामी झाला. यामुळे चालकाचे बसवरील नियंत्रण सुटले आणि हा अपघात घडला. धडकेमुळे रस्त्यावर गोंधळाचे वातावरण निर्माण झाले. जखमींमध्ये दुचाकीस्वार आणि रिक्षा चालकाचा समावेश आहे. सुदैवाने, या अपघातात कोणताही जीवितहानी झालेली नाही.

अपघाताची माहिती मिळताच पुणे पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेतली. त्यांनी वाहतूक नियंत्रित करून परिस्थिती हाताळली. पोलिसांनी बसचालकाविरुद्ध गुन्हा दाखल केला असून, अपघाताच्या कारणांचा तपास सुरू आहे. बसच्या तांत्रिक स्थितीचीही तपासणी केली जाणार आहे.

चांदणी चौक हा पुण्यातील वर्दळीचा परिसर आहे. येथील रस्त्यांची अवस्था आणि वाहनांच्या देखभालीकडे दुर्लक्ष यामुळे अशा घटना वारंवार घडतात, अशी तक्रार स्थानिक नागरिकांनी केली आहे. पीएमपीएल बसच्या नियमित देखभालीवर प्रश्न उपस्थित होत आहेत.